**JAYDEEP B. KULKARNI**
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
**Office :** Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
**Resi. :** "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57
# समाचार
SAMACHAR




■ Volume - 72 ■ Issue- 202 ■ Marathi Daily ■ Thursday 18/4/2024 ■ Pages - 6 ■ Price- Rs. 3

अग्रलेख: भाकीत उत्तम, पण प्रयत्न आवश्यक पान २



श्री. गो. विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत नेत्रदीपक यश पान ५

JITO YOUTH जितो युथ विंगचे आयोजन, सविस्तर मार्गदर्शन आणि प्रवेशासाठी सहकार्य पान ६

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे




'कमीतकमी कॉलेजात गेलेल्या सुशिक्षित व्यक्तीलाच या मतदारसंघातून निवडून पाठवा' अस ते मिडियासमोरही सांगत असतात. कारण ते बारावी आर्टस नापास आहेत व त्यांचा विरोधक नववी नापास!!

### निवडणूक अर्ज विक्री सुरू; सुजय विखे यांनी घेतले दोन अर्ज

# नगर आणि शिर्डी लोकसभेची आजपासून रणधुमाळी



**समाचार/नगर-दि.१८**

नगर दक्षिण आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे निवडणुकीची रणधुमाळी आजपासून सुरू झाली आहे उमेदवारांना दि. २५ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. दाखल उमेदवारी अर्जांची दि. २६ एप्रिल रोजी छाननी केली जाणार आहे दरम्यान या निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी तयारी करण्यात आली आहे.

नगर दक्षिण मतदार संघातून विद्यमान खासदार सुजय विखे पाटील हे पुन्हा मैदानात उतरले आहेत तर महाविकास आघाडी कडून पारनेर चे माजी आमदार निलेश लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि महायुतीकडून खा. सदाशिव लोखंडे असे रिंगणात आहेत. शिर्डी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी नाकारल्याने काँग्रेसच्या उत्कर्ष रूपवते बंडखोरी करण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा पक्षाकडे सादर केला आहे. त्यामुळे या मतदारसंघात रूपवते यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. शिर्डी पेक्षा नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीकडे जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे लक्ष लागले आहे. खा. विखे आणि लंके हे कधी उमेदवारी अर्ज दाखल करतात हे अद्याप निश्चित झालेले नाही दरम्यान खा. सुजय विखे पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे येणार असल्याचे सांगण्यात




आले आहे तर लंके यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शरद पवार येणार असल्याचे सांगितले जात आहे. नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघासाठी नगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे या मतदारसंघासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत तर शिर्डी लोकसभा मतदार संघासाठी राहता येथील अपर जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. दरम्यान लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जारी झाल्यापासून प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. निवडणुकीसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अधिकाधिक मतदान व्हावे यासाठी प्रशासनाकडून जनजागृती करण्यात आली आहे. पोलीस दलाच्या वतीने ही निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उभारण्यात आला आहे तसेच परवानाधारक शस्त्र जमा करून घेण्यात आले आहेत. या निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्याचा राजकीय आखाडा तापला असून आरोप प्रत्यारोप सुरू झाले आहेत. उमेदवाराकडून प्रचार रॅली काढण्यात येत आहे तसेच गावोगाव बैठका आणि मतदारांच्या भेटी घेतल्या जात आहेत.

**असा आहे निवडणूक कार्यक्रम...**

| | |
|---|---|
| उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात | – १८ एप्रिल |
| उमेदवारी अर्ज माघारीची मुदत | – २५ एप्रिल |
| दाखल उमेदवारी अर्जांची छाननी | – २६ एप्रिल |
| उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत | – २९ एप्रिल |
| मतदानाची तारीख | – १३ मे |
| मतमोजणीची तारीख | – ४ जून |

## निवडक

### सुनेत्रा पवार यांचा बारामतीतून अर्ज दाखल



**पुणे, दि. १८–** राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या बारामतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी लोकसभेचा उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी सुनेत्रा पवारांच्या प्रचारार्थ महायुतीची आज पुण्यात जाहीर सभा झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या सभेला उपस्थित होते. यावेळी केलेल्या भाषणात देवेंद्र फडणवीस म्हणाले, बारामतीत वहिनींना कोणीही थांबवू शकणार नाही. बारामतीच्या मागील निवडणुकीत दोन नंबरवर असलेल्या उमेदवार कांचन कुल, तिसऱ्या नंबरवर असणारे उमेदवार नवनाथ पडळकर यांच्यासह सर्वच तगडे नेते इथे आहेत. आता आपल्याला केवळ बारामतीत घरोघरी जाऊन, जनतेपर्यंत पोहोचून लोकांना मतदान केंद्रापर्यंत आणायचं आहे. मला विश्वास आहे की, सूनबाई दिल्लीला जातील म्हणजे जातीलच. आपल्या आशीर्वादाने नवा इतिहास घडेल आणि सूनबाई खासदार बनून दिल्लीला जातील.

### रस्ते बंद केल्याने नागरिकांची गैरसोय; कर्कश डीजेची परंपरा कायम

# श्रीरामनवमीची मिरवणूक उत्साहात

**समाचार/नगर-दि.१८**

प्रभू श्रीराम नवमीनिमित्त बुधवारी सायंकाळी शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून मिरवणूक सुरू झाली. भगवे झेंडे घेऊन घोडेस्वार मिरवणुकीच्या अग्रभागी होते. तसेच, सजवलेल्या रथात प्रभू श्रीराम, लक्ष्मण व सीता यांची वेशभूषा परिधान करून युवक सहभागी झाले होते. दरम्यान, मिरवणुकीत सकल हिंदू समाज व हिंदू राष्ट्र सेना डीजेसह सहभागी झाले होते. सायंकाळी बसस्थानक चौकातून मिरवणूक मार्गस्थ झाली.



माळीवाडा, पाचपीर चावडी, बॉम्बे बेकरी, चांद सुलताना हायस्कूल, माणिक चौक, भिंगारवाला चौक, कापड बाजार, तेलीखुंट, चितळे रस्ता, चौपाटी कारंजा मार्गे दिल्लीगेट येथे मिरवणुकीची सांगता झाली. मिरवणूक मार्गावर बहुतांश दुकाने बंद होती. मिरवणूक मार्गावर वाहतूक बंद केल्याने नागरिकांना पर्यायी मार्ग शोधताना कसरत करावी लागली. दरम्यान, कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मिरवणूक मार्गावर मशिदी झाकण्यात आल्या होत्या. मिरवणुकीत डीजेच्या कर्कश आवाजाने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. कोणतीही वादाची घटना न घडता मिरवणूक शांततेत पार पडली.

## महिलेला धक्काबुक्की करून दोन तोळ्याचे दागिने हिसकावले

**समाचार/नगर-दि.१८**

सायंकाळी फिरण्यासाठी घराबाहेर पडलेल्या वृध्द महिलेला धक्काबुक्की करून सव्वा दोन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने हिसकावून नेले. सदरची घटना मार्केटयार्डच्या पाठीमागील चैतन्य कॉलनीत घडली.

याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उज्वला संपतलाल कटारिया (वय ६५ रा. चैतन्य कॉलनी) यांनी मंगळवारी (दि. १६) फिर्याद दिली आहे. उज्वला कटारिया या रविवारी (दि. १४) सायंकाळी साडेसातच्या सुमारास वॉकिंग करण्यासाठी घराबाहेर पडल्या होत्या. त्या चैतन्य कॉलनीतून जात असताना एका अज्ञात चोरट्यांनी त्यांना धक्काबुक्की करून खाली पाडले. त्यांच्या गळ्यातील सव्वा दोन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावले व मार्केटयार्डच्या दिशेने धूम ठोकली. दरम्यान कटारिया यांना धक्का दिल्याने त्या खाली कोसळून जखमी झाल्या आहेत. त्यांनी रूग्णालयात उपचार घेतल्यानंतर मंगळवारी सायंकाळी कोतवाली पोलीस ठाण्यात **(पान ३ वर)**

## ज्ञानदेव वाफारेचे काँग्रेस पक्षातून निलंबन

**समाचार/नगर-दि.१८**

अहमदनगर (प्रतिनिधी) : बहुचर्चित संपदा नागरी सहकारी पतसंस्थेच्या कथित घोटाळ्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार ज्ञानदेव वाफारे यांना शिक्षा झाल्यानंतर त्यांना जिल्हा काँग्रेस कमिटीने निलंबित केले आहे. अनिश्चित काळासाठी ही कारवाई



करण्यात आल्याची माहिती काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी पत्रक काढून दिली आहेत.

त्यात त्यांनी म्हटले आहे की, काँग्रेस पक्ष हा सदैव संपदा नागरी सहकारी पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या पाठीशी उभा असून संपदा संस्थेत झालेल्या घोटाळ्या प्रकरणी पक्षाने वेळोवेळी निषेध केला आहे. याप्रकरणी वाफारे यांना पाठीशी घालण्याचा प्रश्न नसून पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या तसेच हाय कमांडच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. वाफारे यांच्या ऐवजी जिल्हा समन्वयक पदावर नव्या पदाधिकाऱ्यांची लवकरच नियुक्ती करण्यात येणार असल्याचे वाघ यांनी जाहीर केले आहे.

## डॉ. वरद सप्तर्षी यांचा संशोधन लेख अमेरिकेत प्रकाशित



**समाचार/नगर-दि.१८**

नगरमधील घुमरे गल्ली येथील कै. ॲड. गजानन सप्तर्षी व कै. प्रमिलाबाई सप्तर्षी यांचा थोरला नातू डॉ. वरद राजेंद्र सप्तर्षी याचा संशोधन लेख सुप्रसिद्ध अमेरिकन जर्नल ऑफ ओरल मॅक्सिलोफेशियल सर्जरीमध्ये प्रकाशित होण्यासाठी मान्य झाला. हे संशोधन जगामध्ये महत्वपूर्ण मानले जात असून, डॉ. सप्तर्षी यांनी या संशोधनाद्वारे मोठी कामगिरी बजावली आहे. या जर्नलसाठी येणाऱ्या संशोधन लेखांपैकी फक्त वीस टक्के संशोधन मान्य होतात. हे सर्जरी या विषयातलं नावाजलेलं जर्नल असून, अशा सुप्रसिद्ध जर्नलमध्ये इतक्या लहान वयात लेख मान्य होणं ही एक अभिमानास्पद गोष्ट आहे. 'डोळ्याच्या आजूबाजूला असलेल्या हाडाच्या फ्रॅक्चरमध्ये कुठल्या अत्याधुनिक पद्धती वापरून उत्तम निकाल मिळू शकतात' हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. डॉ. वरद सध्या मुंबईत असलेल्या एम.जी.एम् रुग्णालयात चेहरेपट्टी (फेशियल सर्जरी) या विषयाचा रहिवासी सर्जन म्हणून कार्यरत आहेत.




### विकसित देश बनण्याकडे भारताची वाटचाल

# सर्वात अगोदर महाराष्ट्र गाठणार एक ट्रिलियन अर्थव्यवस्था

नवी दिल्ली, दि.१८– भारत सध्या आर्थिक आघाडीवर उत्तम काम करत आहे. जागतिक रेटिंग एजन्सी तसेच जगातील अनेक देशांचा भारताच्या आर्थिक प्रगतीवर पूर्ण विश्वास आहे. आर्थिक प्रगतीच्या या वाटचालीत देशातील राज्यांचेही मोठे योगदान आहे. एका अहवालानुसार, भारतातील अनेक राज्ये स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्षात एक ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठतील.

इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्चने आपल्या अहवालात म्हटले आहे की, भारत हळूहळू २०४७ पर्यंत विकसित देश बनण्याच्या ध्येयाकडे वाटचाल करत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला १९४७ पर्यंत विकसित करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. अहवालानुसार, महाराष्ट्र, कर्नाटक आणि गुजरात ही ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था असलेली पहिली राज्ये बनू शकतात. ही तीन राज्ये २०३९ च्या आर्थिक वर्षातच हा आकडा गाठू शकतात. यामध्येही हा आकडा




गाठणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरू शकते. यानंतर कर्नाटक आणि गुजरात येतील. आर्थिक वर्ष २०४२ पर्यंत उत्तर प्रदेश हा आकडा गाठू शकतो.महाराष्ट्राने २०२८ पर्यंत, उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूने २०३० पर्यंत आणि कर्नाटकने २०३२ पर्यंत एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचे लक्ष्य समोर ठेवले आहे. तथापि, इंडिया रेटिंग्स अँड रिसर्च या देशांतर्गत रेटिंग एजन्सीचा विश्वास आहे, की ही सर्व राज्ये त्यांच्या संबंधित मुदती चुकवू शकतात. कर्नाटकने उत्तर प्रदेशला मागे टाकत २०२३ या आर्थिक वर्षात देशातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचा दर्जा प्राप्त केला आहे. २०२८ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचे लक्ष्य आहे. भारताने २०२८ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचे लक्ष्य ठेवले आहे. सध्याच्या आर्थिक विकासदरानुसार,२०२८ पर्यंत केवळ तीन राज्ये ०.५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनू शकतील. विकसित देशांच्या बरोबरीने दरडोई उत्पन्नाचा आकडा गाठण्यासाठी राज्यांना खूप वेळ लागणार आहे. या बाबतीत, उत्तर प्रदेश आणि बिहार सध्या कमी उत्पन्न गटात मोडतात. राष्ट्रीय दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत छत्तीसगड, उत्तर प्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि पंजाब या राज्यांना आपली कामगिरी सुधारावी लागेल.

संपादकीय

# भाकीत उत्तम, पण प्रयत्न आवश्यक

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने, म्हणजेच एनएसओने २०२३-२४ या वर्षात आर्थिक विकासाचा दर ७.६ टक्के असेल, असा अंदाज व्यक्त केला होता. परंतु प्रत्यक्षात तो आठ टक्के किंवा त्यापेक्षाही जास्त असेल, असे अर्थमंत्र्यांना वाटत आहे. प्रगतीचा वेग आठ टक्क्यांच्या वर राहिला, तर ते कौतुकास्पदच मानावे लागेल. मात्र देशाला समृद्ध भारताच्या दिशेने घेऊन जायचे असेल तर हा वेग दहा टक्क्यांपेक्षाही जास्त असला पाहिजे आणि त्यात सातत्य असणेही आवश्यक आहे. असे झाले, तरच पाच ट्रिलियन डॉलर्सचे लक्ष्य गाठता येईल. शिवाय आज भारतीय अर्थव्यवस्था ही जगात पाचव्या क्रमांकावर आहे. ती तिसऱ्या क्रमांकावर न्यायची असेल, तर विकासाचा झपाटा अधिक असणे आवश्यक आहे. याचे कारण, जगातील अन्य देशही घोडदौड करण्याच्या मागे लागले आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे. अर्थव्यवस्थेच्या क्षमतेनुसार हे उद्दिष्ट गाठणे फारसे अवघड नाही; परंतु भारताची सध्याची परिस्थिती अनेक समस्यांना तोंड देत आहे. यामध्ये मुख्य आव्हान आर्थिक क्षेत्राचे असून इतर समस्याही आहेत. त्यावर मात करणे आवश्यक आहे. सरकारने अर्थसंकल्प आणि धोरणांच्या माध्यमातून या दिशेने प्रयत्न सुरू केले आहेत. शिक्षणाचा दर्जा, बेरोजगारी, आर्थिक विषमता, महिलांची स्थिती, कुपोषण, जातीभेद, गरिबी इत्यादी महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यांची दखल घेणे आवश्यक आहे. वर नमूद केलेल्या समस्या दूर करूनच भारतातील समावेशाचा आदर्श गाठता येईल. हे लक्षात घेण्यासारखे आहे की पुरवठ्याची बाजू कितीही मजबूत केली तरी मागणीची बाजू कमकुवत असल्याशिवाय ते अर्थव्यवस्थेत लक्षणीय योगदान देऊ शकत नाही. सामाजिक रचना सर्वसमावेशक करूनच मागणीची बाजू बळकट होऊ शकते. त्यामुळे सरकारला केवळ पुरवठ्याकडेच नव्हे, तर मागणीच्या बाजूकडे किंवा समाजकल्याणाकडेही लक्ष द्यावे लागेल. सर्वांसाठी गृहनिर्माण योजना, किसान सन्मान योजना, आयुष्मान भारत योजना, मनरेगा योजना हे सरकारचे कार्यक्रमही या दिशेने सरकार करत असलेले प्रयत्न दर्शवतात. गेल्या दशकात नवीकरणीय ऊर्जेत सात पटींनी वाढ झाली आहे; परंतु भारताचे ऊर्जा क्षेत्र अजूनही मुख्यतः कोळसा-आधारित आहे. या प्रकारचे कोळसा संयंत्र ८० टक्के ऊर्जा तयार करतात. या प्रकारच्या ऊर्जेचे प्रसारण अकार्यक्षम आणि व्यर्थ आहे. अक्षय ऊर्जेचे उत्पादन वाढवून आणि प्रसारणात सुधारणा करून ऊर्जा क्षेत्राची कार्यक्षमता वाढवता येते. त्यामुळे हा प्रदेश उद्योग आणि ग्राहकांच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करू शकेल. देशाच्या अर्थव्यवस्थेत उत्पादनाला चालना देण्यासाठी ऊर्जा खूप महत्वाची भूमिका बजावते. भारतामध्ये जागतिक वाहतूक पायाभूत सुविधांचा अभाव आहे, ग्रामीण आणि दुर्गम भागात अजूनही कनेक्टीव्हिटीचा अभाव आहे. आंतर्देशीय जलमार्गाच्या क्षेत्रात काही काम केले गेले आहे; परंतु भारताच्या नद्यांमध्ये जलमार्ग म्हणून वापरण्याची जास्त क्षमता आहे. भारतीय रेल्वेने जगातील सर्वात मोठे रेल्वेमार्ग उभारले आहेत. तरीही रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी अंदाजे ५० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उच्च दर्जाचे रस्ते उपलब्ध करून देणे, बंदरांची क्षमता वाढवणे आणि त्यांना रेल्वे आणि रस्त्याच्या माध्यमातून देशातील विविध आर्थिक आस्थापनांशी जोडणे आवश्यक आहे. यामुळे अर्थव्यवस्था अधिक वेगाने वाढू शकेल. दरम्यान, भारतात पाण्याची कमतरता ही एक सामान्य समस्या बनली असून कचऱ्याचे मोठमोठे ढीगदेखील सर्व शहरांमध्ये आढळतात. देशाचे कचरा व्यवस्थापन कुचकामी ठरत असून पर्यावरण प्रदूषित होत आहे. सांडपाणी आणि कचरा पुनर्वापर व्यवस्थापनाद्वारे वरील मुद्यांवर उत्तरे शोधली जाऊ शकतात. प्रदूषण नियंत्रण मंडळालाही पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. भारतातील दूरसंचार क्षेत्रही समस्याग्रस्त आहे. इतर देशांनी फाईव्ह जी वापरण्यास सुरुवात केली असली तरी भारतात त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न झालेले नाहीत. आधीच दूरसंचार क्षेत्र ट्राय आणि सरकारच्या स्पेक्ट्रम आणि त्याच्या आधारभूत किमतींबद्दलच्या धोरणामुळे संघर्ष करत आहे. भारतातील स्थानिक पातळीवर इंटरनेट सेवा देण्यासाठी सुरू करण्यात आलेला भारत नेट प्रकल्प अद्याप पूर्ण झालेला नाही. येणारा काळ डिजिटल अर्थव्यवस्थेचा आहे आणि या शर्यतीत मागे राहणाऱ्या देशाला मोठी आर्थिक किंमत चुकवावी लागेल. त्यामुळे भारताने या क्षेत्राच्या सुधारणेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. इंटरनेट यंत्रणा सर्वसमावेशक बनवल्यास डिजिटल अर्थव्यवस्थेला गती मिळू शकेल, हे ही इथे नमूद केले पाहिजे. सुदैवाने मागील आर्थिक वर्षात पहिल्या तीन तिमाहींमध्ये सकल राष्ट्रीय उत्पादनात ८.२ टक्के, ८.१ टक्के आणि ८.४ टक्के अशा गतीने वाढ झाली. यावरून चौथ्या तिमाहीतही किमान आठ टक्के वाढ होईल, असे वाटते. तरीदेखील देशामध्ये उपभोग खर्चात पुरेशी वाढ झालेली नाही. तसेच लोकांची मागणी कमी आहे, अशी अर्थतज्ज्ञांची टीका आहे. परंतु किमान मागणी असल्याविना आठ टक्कयांची वाढ साध्य होईल, असे वाटत नाही. केअर रेटिंगच्या ताज्या अहवालानुसार, बँकांचे थकीत कर्जांचे प्रमाण २.१ ते २.४ टक्के इतके खाली येणार आहे. राष्ट्रीयीकृत बँकांचा कारभार हळूहळू सुधारत आहे, ही आशादायक बाब आहे. असेच घडत राहिल्यास, सरकारला या बँकांना दरवर्षी भागभांडवल पुरवण्याची गरज राहणार नाही.

## रामनवमीनिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबीर



समाचार/नगर-दि.१८

सावेडी येथील पवन नगर येथे श्रीराम मंदिरात श्रीराम नवमी निमित्त एच व्ही देसाई नेत्र रुग्णालयाच्या वतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच नेत्र तपासणी शिबिरास रुग्णांनी मोठा प्रतिसाद दिला. पवन नगर येथील श्रीराम मंदिरात महाआरती करून शिबिरास सुरुवात करण्यात आली.

शिबिरामध्ये १०० रुग्णांचे नेत्र तपासणी करून ३५ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी पुणे येथील नेत्र रुग्णालयात रवाना करण्यात आले. यावेळी रुग्णांची रक्तदाब, मधुमेह तपासणी करण्यात आली. ज्या रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया करायचे असेल त्यांनी स्वामी समर्थ मंदिरामागे, हॉटेल ओबेरॉय समोर, नगर-शिर्डी रोड, सावेडी, येथे संपर्क साधावा, असे आवाहन एच.व्ही. देसाई, रुग्णालयाचे प्रमुख शुभम बोज्जा यांनी केले.

या नेत्र शिबिरात डॉक्टर आनंद बोज्ञा रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले शिबिरासाठी श्रीराम मंदिर देवस्थानचे सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## व्यसन टाळण्यासाठी संतांच्या विचारांची गरज-चिमणे



समाचार/नगर-दि.१८

समाजामध्ये वावरत असताना संतांना आवडेल असा परमार्थ करून साधू, संतांचे विचार आत्मसात करावे. उपदेश करणे हे प्रत्येकाला आवडत असते आणि दुसऱ्याला चांगले सल्ले देत असतो. मात्र स्वतः च्या कृती मध्ये वाईट विचार समोर येत असते. यासाठी जसे उपदेश देत असतो तसेच आपण वागावे. विज्ञान युगामध्ये मनुष्य मोबाईलचा गरजे पेक्षाअति वापर करीत असल्यामुळे मानसिक संतुलन बिघडत आहे. व्यसन म्हणजे मानवतेला त्रास देणारे ठरत आहे. आजची युवा पिढी व्यसनाधीनते कडे वळत असून त्यांना संतांच्या विचाराची खरी गरज आहे. माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल गेल्या ३५ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करून समाजाला एकत्रित आणण्याचे काम करत आहे. असे प्रतिपादन ह.भ.प. दिनकर महाराज चिमणे यांनी केले.

नालेगाव गाडगीळ पटांगण येथे श्री छत्रपती शिवराय तरुण मंडळ व पवन हनुमान व्यायाम शाळा यांच्यावतीने श्रीराम नवमी व हनुमान जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ह.भ. प. दिनकर महाराज चिमणे यांची कीर्तन झाले. यावेळी मालेगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री छत्रपती शिवराय तरुण मंडळ व पवन हनुमान व्यायाम शाळा यांच्यावतीने गेल्या ३५ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे अशी माहिती दत्तात्रय मुदगल यांनी दिली.

## 'जागतिक वसुंधरा दिना'च्या निमित्ताने










विज्ञान भारती

येत्या २२ एप्रिलला जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवसाच्या निमित्ताने समस्त पृथ्वीवासियांकरिता खूप मोठे आव्हान ठेवलेले आहे. हे आव्हान म्हणजे वर्ष २०४० पर्यंत जगातील ६० टक्के प्लास्टिक वस्तूंचे उत्पादन कमी करावयाचे आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने सन २००९ साली २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय वसुंधरा दिवस म्हणून पाळण्याची घोषणा केली. परंतु हा दिवस १९७० पासून अमेरिकेत साजरा करण्यात येतो. यावर्षी जवळजवळ ५४ वर्ष त्याला पूर्ण होतील. यावर्षीची थीम आहे पृथ्वी व प्लास्टिक. अर्थातच प्लास्टिकच्या या भस्मासुराला नष्ट करण्यासाठी कोणकोणती पाऊलं उचलायची याची जनजागृती आवश्यक आहे.

आपल्या वसुंधरा रक्षणाच्या दृष्टीने अनेक आघाड्यांवर आपणाला काम करावे लागणार आहे. आपल्या भारतासाठी विशेषतः प्लास्टिकची योग्य विल्हेवाट लावणे हे फार मोठे आव्हान आहे.

खरेतर औद्योगिक क्रांतीनंतर त्यांच्या मागून येणारे गंभीर परिणाम मानवाला भेडसावू लागले. निसर्गावरील आघात वाढत चालले. या सर्व गोष्टींचे भवितव्यात वाईट परिणाम फक्त मानवालाच नाही तर समस्त जीवसृष्टीला होणार हे आता शास्त्रज्ञ व समाज सुधारकांना समजले आहे.

एकविसाव्या शतकात प्लास्टिक नावाचा भस्मासुर उदयास आला आहे. प्लास्टिक मध्ये असलेल्या गुणांमुळे ते आपल्या दैनंदिन जीवनामध्ये मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येत आहे. यामध्ये अर्थातच प्लास्टिकच्या पिशव्या, दूध, तेल, भाजी, धान्य तसेच इतर अनेक पदार्थांच्या वेस्टनांमध्ये प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. प्लास्टिक नाशवंत नाही, ते विघटित होत नाही आणि शेकडो वर्ष राहू शकते यामुळे पर्यावरणाच्या नाशास कारणीभूत ठरले आहे. हे प्लास्टिक इतक्या मोठ्या प्रमाणावर पसरले आहे की त्याला नष्ट कसे करावे हाच मोठा प्रश्न आहे. त्याला वेगळे करणे शक्य नाही, बाहेर दरीत फेकणे शक्य नाही. प्लास्टिकचे जैविक विघटन करणे खूप चांगला पर्याय आहे व वैज्ञानिक त्या दिशेने काम करत आहेत.

जपान येथील क्योटो विद्यापीठातील प्रोफेसर सोसुके योशिदा यांनी या संदर्भात महत्त्वाचे संशोधन केले आहे. झएढ किंवा टरथॅलेट हा पदार्थ बहुतांशी प्लास्टिक वस्तू बनवण्यासाठी वापरला जातो.

प्रोफेसर योशिदा यांनी असा जिवाणू शोधून काढला आहे जो या झएढ चे जैविक विघटन करू शकतो. याकरता तो जिवाणू दोन संप्रेरके (Enzymes) वापरतो. प्रथम हा जिवाणू या प्लास्टिकला चिकटतो व त्याच्या मधील एक संप्रेरक या प्लास्टिकचे हायड्रोलिलीस (तोडणे) करते व दुसरा संप्रेरक त्यानंतर या प्रॉडक्ट पासून दोन मोनोमर (अजुन बारीक तुकडे) बनवतो. हे मोनोमर म्हणजेच इथिलीन ग्लायकॉल व टरथॅलिक सिड.

खरेतर या दोन मोनोमरच्या संयुक्तीकरणातून प्लास्टिकचे झएढ हा पॉलिमर बनतो. प्रोफेसर योशिदा यांनी पाहिले की प्लास्टिकचे एक छोटेसे शीट साधारणपणे सहा आठवड्यात नष्ट करणे शक्य आहे. मुख्य म्हणजे यातून फक्त कार्बन डाय-ऑक्साइड वायू बाहेर पडतो.

थोडक्यात काय प्लास्टिकचे जैविक विघटन आज जवळजवळ शक्य झाले आहे. हे संशोधन व्यावसायिक दृष्ट्या वापरण्यासाठी काही काळ जावा लागणार आहे. मात्र आपल्या वसुंधरेला धोका पोहोचवणाऱ्या या राक्षसाला रोखण्यासाठी आज आपण सज्ज आहोत, ही फार मोठी आशादायक गोष्ट आहे. प्लास्टिकला आटोक्यात आणण्याचे प्रयत्न प्रशासकीय व वैज्ञानिक पातळीवर चालूच आहेत. पण एक सामान्य नागरिक म्हणून आपली पण जी जबाबदारी आहे ती सुद्धा आपण आता ओळखणे गरजेचे आहे.

- डॉ.दत्ता पोंदे
मोबाईल- ७३८७९००७००




### राशीभविष्य

- **मेष** : अनपेक्षित घटना घडतील. महत्त्वाच्या कामात अडचणी येतील. प्रवासात पुरेशी काळजी घ्यावी.
- **वृषभ** : आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. बोलताना पुरेशी काळजी घ्या. विवाहातील अडचणी दूर होतील.
- **मिथुन** : कामासाठी धावपळ, दगदग होईल. उत्पन्नाचे नवे मार्ग सापडतील. प्रियजनांचा सहवास लाभेल.
- **कर्क** : मुलांची अपेक्षित प्रगती होईल. प्रक्रिया उद्योगात अनुकूलता राहील. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **सिंह** : घाईगडबडीत निर्णय घेऊ नका. आर्थिक बाबतीत विचारानं रहावं. कौटुंबिक अडचणी संभवतात.
- **कन्या** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. हितशत्रूंपासून सावध रहावं. ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल.
- **तूळ** : रखडलेली कामं मार्गी लागतील. धार्मिक समारंभात सहभागी व्हाल. अडचणी वेळीच दूर होतील.
- **वृश्चिक** : विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. आर्थिक प्राप्ती उत्तम राहील. उत्तम धनलाभाचे योग आहेत.
- **धनु** : आजचा दिवस शुभ फलदायी ठरेल. जुनी येणी सहज वसूल होतील. मनाजोग्या घटना घडतील.
- **मकर** : ग्रहमानाची विशेष अनुकूलता राहील. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **कुंभ** : गुंतवणूक विचारानं करावी. कारकिर्दीत प्रगतीच्या संधी लाभतील. कामाचा ताण वाढता राहील.
- **मीन** : आशावादी रहा. नोकरीत बदलाचा विचार होईल. व्यवसायात प्रगती साधारण स्वरूपाची राहील.

### दिन विशेष

**१९ एप्रिल**

- **१८९७:** उद्योगपती पीटर दी नरोन्हा यांचा जन्म.
- **१९७५:** 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला भूस्थीर उपग्रह अवकाशात सोडला गेला.
- **१९५७:** उद्योगपती मुकेश अंबानी यांचा जन्म.
- **२०१२:** भारताने अग्नि-५ चं यशस्वी प्रक्षेपण केलं.
- **२०१८:** ९८ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदे ज्येष्ठ रंगकर्मी कीर्ती शिलेदार यांची एकमताने निवड.

### आरोग्यमंत्र — दररोज परफ्यूम वापरता?

शरीराची दुर्गंधी दूर करुन फ्रेशनेस टिकवण्यासाठी अनेक जण परफ्यूमच्या नित्याच्या वापराला प्राधान्य देतात. दरवळणाऱ्या सुगंधामुळे व्यक्तिमत्त्वाची वेगळी ओळख निर्माण होते. मात्र दररोज परफ्यूम वापरणाऱ्यांनी सावध रहायला हवं. परफ्यूमच्या रोजच्या वापराचे दुष्परिणाम अतिशय गंभीर असू शकतात. परफ्यूममध्ये अनेक रसायनांचा वापर असतो. या कृत्रिम रसायनांचा नित्याचा संपर्क अनारोग्याचं कारण ठरतो.




✼ यातील विषारी घटकांमुळे श्वसनासंबंधीच्या तक्रारी उद्‌भवतात. ✼ दररोज एकाच जागी परफ्यूम स्प्रे करत राहिल्यास जखमांची शक्यता वाढते. आधी याठिकाणी व्रण अथवा चट्टे दिसू लागतात नंतर त्याजागी बॅक्टेरियांची वाढ होते. कालांतराने या जागी जखमा होतात. ✼ परफ्यूममधील घातक रसायनांमुळे संप्रेरकांमध्ये असंतुलन होण्याचा धोका असतो. ही बाबही अनारोग्यास कारक ठरते. ✼ परफ्यूमच्या नित्य वापरामुळे घाम उत्पन्न करणाऱ्या ग्रंथींचं काम बाधित होतं. घाम न आल्यास त्वचेतील विषाक्त घटक बाहेर पडू शकत नाहीत. परिणामी त्वचाविकार संभवतात. ✼ निकृष्ट दर्जाच्या परफ्यूममध्ये नैसर्गिक घटकांचा अभाव असतो. त्याऐवजी कृत्रिम रसायनांच्या सहाय्याने सुगंध निर्मिती केली जाते. मात्र या रसायनांमुळे बऱ्याच जणांना ॲलर्जीचा धोका संभवतो. म्हणूनच दखल घ्यायला हवी.

### महत्त्वपूर्ण काही... — मोहिमा संरक्षण दलांच्या

आपल्या देशावर संकट आलं की संरक्षण दलं सज्ज होतात. आपलं लष्कर, नौदल आणि हवाई दल विविध मोहिमा राबवतं. या मोहिमांमध्ये आपले धाडसी सैनिक सर्वस्व पणाला लावतात. भारतीय संरक्षण दलांनी आजवर राबवलेल्या अशाच काही मोहिमांविषयी. ✼ भारताने कारगिल युद्धात विजय मिळवला. ही मोहीम 'ऑपरेशन विजय' म्हणून ओळखली जाते. २६ जुलै १९९९ हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. ✼ जुलै २०१६ मध्ये दक्षिण सुदानमधल्या अंतर्गत युद्धात ६०० भारतीय अडकून पडले होते. त्यांना यशस्वीपणे सोडवून आणण्यासाठी 'संकटमोचक' ही मोहीम राबवण्यात आली. ✼ उत्तराखंड तसंच हिमाचल प्रदेशमध्ये २०१३ च्या जून महिन्याच्या पावसात अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी भारताच्या हवाई दलाने 'ऑपरेशन राहत' ही मोहीम राबवली होती. ✼ 'हुडहूड' नावाच्या चक्रीवादळाने २०१४ मध्ये आंध्र प्रदेश, विशाखापट्टणम आणि ओरिसाच्या किनारपट्टीच्या भागात धुमाकूळ घातला होता. लोकांना सोडवण्यासाठी 'ऑपरेशन लहर' ही मोहीम राबवण्यात आली होती.

### सल्ला मोलाचा — करून पहावे असे काही



✼ उंदरांचा त्रास टाळण्यासाठी कपाटात आणि शोकेसमध्ये डांबराच्या गोळ्या घालून ठेवाव्यात. उंदीर राहत नाहीत. ✼ कपड्यावर ऑईलचे डाग पडले असल्यास निलगिरी तेलाने स्वच्छ करावेत. ✼ कपड्यावर भाजी-आमटीचे डाग पडल्यास फेस पावडर चोळावी आणि नंतरच कपडा धुवावा. डाग नाहिसे होतात. ✼ खिडकीच्या काचांवर सिमेंट उडाले असेल तर ओल्या वाळूनं घासावे. डाग लगेच निघतात. ✼ पाण्याच्या माठाला छिद्र पडले असेल अथवा चिर असेल तर प्लास्टिकचे तुकडे गॅसवर गरम करावेत आणि माठावर चिकटवावे. यामुळे तात्पुरत्या स्वरुपात डागडुजी होवू शकते. ✼ फुगल्यामुळे दारं नीट लागत नसेल तर कडांवर साबणाची वडी घासावी. यामुळे उघडझाप सहज होते.

### पंचांग

**शुक्रवार, १९ एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र शु. ११, नक्षत्र : मघा
चंद्रराशी : सिंह, वृद्धि योग
सूर्योदय: ०६.२१, सूर्यास्त: ६.५५

### फॉरवर्डस

**कवीने दिलेला हा संदेश प्रत्येकाने लक्षात घेण्याजोगा आहे**

जमाने में आएं हो तो
जीने का हुनर रखना
दुश्मनों का कोई खतरा नहीं
बस अपनों पर नजर रखना

### टेक्नो टॉक

मोबाईलमधल्या बहुतांश ॲप्लिकेशन्ससाठी इंटरनेट वापरावं लागतं त्यामुळे युजर्स मोठ्या प्रमाणात इंटरनेट डाटा वापरतात. अँड्राइड स्मार्टफोनमध्ये तर या डाटाचा प्रचंड वापर होतो. मात्र काही उपायांनी तुम्ही डाटा वाचवू शकता. सेटिंग्जमध्ये डाटा लिमिट सेट करण्याची सोय असते. त्याचा वापर करून तुम्ही दिवसाच्या वापराची मर्यादा ठरवू शकता. काही ॲप्स उगाचच डाटा वापरतात. प्रत्येक ॲपचा डाटा युसेज जाणून घेण्यासाठी सेटिंग्जमध्ये जा.इथे कोणत्याही ॲपवर टॅप करून तुम्ही ॲपचा फोरग्राउंड आणि बॅकग्राउंड युसेज तपासू शकता.

### करिअरवाटा — करा मनाचा अभ्यास

करिअरचा विचार करताना मानसशास्त्र ही एक संपन्न ज्ञानशाखा आहे याची नोंद घ्यायला हवी. एका आकडेवारीनुसार देशामध्ये १.८० लाख मानसशास्त्रज्ञांची गरज आहे असून आजमितीस लाखाच्या वर मानसशास्त्रज्ञसुद्धा उपलब्ध नाहीत. त्यामुळे कायमच या तज्ज्ञांची कमतरता जाणवते.



सध्याच्या धकाधकीच्या काळात लोक तणावात जगताना दिसतात. मात्र त्यांना समुपदेशनातून तणावमुक्त केलं तर आजार पळून जाऊ शकतात. विद्यार्थ्यांमध्येही अनेक मानसिक व्याधी बळावत आहेत. विद्यार्थी आत्महत्या करत आहेत. त्यांनाही समुपदेशनाची गरज आहे. आता बऱ्याचशा शाळांमधून विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी मानसशास्त्रज्ञांची नियुक्ती होऊ लागली आहे. त्यामुळे इथेही मोठ्या प्रमाणावर संधी आहेत. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी बी.ए.ला मानसशास्त्र हा विषय घेतला जातो. अर्थात केवळ मानसशास्त्र विषय घेतला म्हणून समुपदेशक होता येत नाही. त्यासाठी समोरच्या व्यक्तीच्या मनात प्रवेश करण्याची कला अवगत असावी लागते. एम.ए.ला क्लिनिकल सायकॉलॉजी या विषयात स्पेशलायझेशन केल्यास मानसशास्त्रज्ञ म्हणून व्यवसाय करण्याचा मार्ग मोकळा होतो.

### खेचाखेची — मुर्खाबरोबर आयुष्य नको!

संजू गर्लफ्रेंडच्या बाबांना भेटायला तिच्या घरी जातो.

**मुलीचे बाबा:** हे बघ, पोटच्या मुलीने एका मुर्ख माणसाबरोबर आयुष्य काढावं असं मला अजिबात वाटत नाही.

.
.
.

**संजू:** माझंही हेच मत आहे काका. म्हणूनच तर तिला इथून न्यायला आलो आहे.

### जीके टेस्ट

काही माणसं अजिबोगरीब करिश्मे दाखवून लक्ष वेधून घेतात. लंडनमध्ये स्टॉक क्रॉस्बीनं दाखवलेल्या चमत्काराचा विचार करायला हवा. माणूस जमिनीवर धावू शकतो. विशिष्ट यंत्रणेच्या सहाय्यानं हवेमध्ये पक्षासारखं उडू शकतो. मात्र कुठल्याही तांत्रिक घटकांचा आधार न घेता तो पाण्यावर चालू शकत नाही. क्रॉस्बीनं १२.५ मीटर लांबीच्या स्वीमिंग पूलमध्ये पाण्यावर चालण्याचा करिश्मा करून दाखवला. एक थरारक जादू म्हणून उपस्थितांनी या प्रयोगाचा आस्वाद घेतला. मात्र पाण्याखाली मोनोफ्लेक्स पॉलिस्टरचं पातळ शीट अंथरुन पाण्यावर चालण्याचा आभास निर्माण करता येतो असं तज्ज्ञ सांगतात. शेवटी खरं-खोटं 'जादूगार' क्रॉस्बीलाच ठावं...

### स्टाईल स्टेटमेंट — स्टोल असावा साजेसा

तापमानात कमालीची वाढ होत असताना त्वचेप्रमाणेच केसांवरही वाईट परिणाम होत असतो. प्रखर उन्हाच्या प्रकोपापासून वाचण्यासाठी स्टोलची चांगली मदत होते. सध्या नव्या रंगात आणि ढंगात विभिन्न प्रकारचे स्टोल्स उपलब्ध आहेत. जाणून घेऊ त्यांच्या रंगरुपाविषयी-



✼ फ्लोरल किंवा ॲनिमल प्रिंट- उन्हाळा आणि फ्लोरल प्रिंट हे परफेक्ट कॉम्बिनेशन आहे. आता यात ॲनिमल प्रिंटची भर पडली आहे. बाजारात या प्रिंटचे स्टोल उपलब्ध आहेत. फ्लोरल स्टोल्स सिल्क, शिफॉन, सॅटिन किंवा कॉटनपासून तयार केले जातात. ✼ ब्लॅक आणि व्हाईट स्टोल- उन्हाळ्यात काळा रंग टाळला जातो. पण तो इतर रंगांसोबत ट्राय केला तर शोभून दिसतो. व्हाईट स्टोलला युवतींची पसंती आहे. ✼ पार्टीवेअर स्टोल- स्टोल स्टाईल स्टेटमेंट बनवणार असाल तर पार्टीवेअर स्टोल दिमतीला हजर आहेत. ते आरसे आणि मोती वर्कने सजवलेले असतात. कॉटन फॅब्रिकमध्येही ते उपलब्ध असतात. ✼ चौकोनी स्टोल- चौकोनी आकार असणारे हे स्टोल तुम्ही आवडीप्रमाणे ड्रेप करू शकता. एथनिक वेअरवर ते उठावदार लूक देतात.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार
गुरुवार, दि. १८ एप्रिल २०२४ पान ३

## सुविचार

ध्येय तीच व्यक्ती गाठू शकते ज्यांच्या स्वप्नामध्ये उमेद असते.
संकलित

## सामान्यज्ञान

लुफ्तांसा ही विमान सेवा ६ फेब्रुवारी १९१९ रोजी बर्लिन ते विमार दरम्यान दिली गेली.
संकलन - अरविंद ब्राम्हणे

पान १ वरुन

### दोन तोळ्याचे दागिने हिसकावले

फिर्याद दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे करत आहेत.

# चारशे जागांच्या यशात खा. विखेंचा समावेश- भालसिंग

**समाचार/नगर-दि.१८**

सरकारच्या योजनांची गॅरेंटी देशातील जनतेला आली आहे. देशाने पंतप्रधान मोदींचे नेतृत्व स्विकारले आहे. भाजपाच्या नेतृत्वाखाली पुन्हा तिसऱ्यांदा सत्ता येणार असून नगरचे विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचाही समावेश चारशे जागांच्या ऐतिहासिक विजयात राहील असा विश्वास नगर भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी व्यक्त केला आहे. नगर जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर महायुती कडून सुरू असलेल्या प्रचाराची माहीती जिल्हाध्यक्ष भालसिंग यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.



भालसिंग म्हणाले की, मागील १० वर्षाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला जगाच्या केंद्रस्थानी पोहचविले आहे. मोदींच्या नेतृत्वात येणाऱ्या काळात भारत आर्थिक महासत्ता म्हणुन उदयास येईल यात कोणतीही शंका नाही. मोदी सरकारच्या काळात सर्वाधिक लोक कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या यामुळेच देशातील ३० कोटीहून अधिक लोक गरिबीतून बाहेर आले. महिलांना अनेक योजनांच्या मार्फत बळकटी देण्याचे काम मोदी सरकारच्या काळात झाले. त्याच बरोबर आंतरराष्टीय संबंधात सुधारणा झाली. यामुळे मोदींच्या नेतृत्वात भारताची विकसित देशाकडे वाटचाल होत असताना देशाने मोदींवर विश्वास ठेवला आहे लोकसभा निवडणुकीच्या निमिताने मोदीच्या नेतृत्वाखाली झालेले निर्णय मतदारपर्यत पोहचविण्याचे काम प्रचाराच्या माध्यमातून पदाधिकारी कार्यकर्ते करीत असल्याचे सांगितले. खा. डॉ. सुजय विखे यांनी आपल्या खासदारकीच्या कारकिर्दीत केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्फत मोठ्या प्रमाणात निधी आणुन जिल्ह्यात विविध विकासकामे पुर्ण केली आहेत. त्याच प्रमाणे शासनाच्या विविध योजना शेवटच्या लाभार्थ्यां पर्यंत त्यांनी पोहचविल्या आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावी करणारा जिल्हा म्हणून अहील्यानगर प्रथम क्रमांकावर असल्याकडे भालसिंग यांनी माध्यमांचे लक्ष वेधले.



# मोदींच्या काळात राष्ट्रकल्याणाचे ऐतिहासिक निर्णय - डॉ.सुजय विखे

**समाचार/नगर-दि.१८**

मोदी सरकारच्या काळात देशात ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले. त्यात अनुच्छेद ३७० हटविणे, नागरिकता संशोधन विधेयक आणणे. राम मंदिर उभारणी, तीन तलाकच्या मुद्यावर धोरणात्मक निर्णय, देशातील सैन्याला बळ देण्यासाठी वायुसेनेत आठ अपाचे लढावू हेलिकॉप्टर सामील करणे, ३६ राफेल विमाने सैन्यात दाखल करणे. ३ कोटीहून अधिक लोकांना आयुष्यमान आरोग्य कवच , २ कोटीहून अधिक लोकांना अटल पेंशन, प्रधानमंत्री किसान योजना, जनधन योजना,प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, श्रमिक कल्याण योजना, आत्मनिर्भर भारत, स्टार्टअप इंडिया अशा अनेक योजनांमुळे भारत विकसीत देशाकडे वाटचाल करत आहे.त्यामुळे देशात मोदींची गॅरंटी सुरू असून त्यांच्या कार्यावर जनता विश्वास ठेवील असा विश्वास

महायुतीचे उमेदवार खा. सुजय विखे यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर माणिकदौंडी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खासदार सुजय विखे पाटील बोलत होते. आमदार मोनिका राजळे, जिल्हाबँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले तालुका अध्यक्ष मृत्यूंजय गर्जे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, संजय बडे, अशोक चोरमले,भिमराव फुंदे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. मेळाव्यापुर्वी खासदार विखे पाटील यांची बैलगाडीतून मिरवणूक काढून कार्यकर्त्यांनी उत्फुर्त स्वागत केले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी खासदार सुजय विखे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला.

डॉ.सुजय विखे पुढे म्हणाले देशातील सामान्य माणुस, शेतकरी, कामगार, महिला आणि युवा वर्गाला पाठबळ _ देण्याऱ्या योजनांची अंमलबजावणी यशस्वी झाल्यामुळे देशातील जनतेचा मोदींजींवर पूर्णपणे विश्वास आहे.

# पैसे मागितल्याच्या कारणावरुन मारहाण

**समाचार/नगर-दि.१८**

काकडी खरेदीचे पैसे मागितल्याचा राग आल्याने भाजीपाला विक्री करणाऱ्या व्यवसायिकाला कुऱ्हाडीने मारहाण करून त्यांच्या खिशातील एक हजार ८०० रूपये व आधारकार्ड बळजबरीने काढून घेतल्याची घटना मंगळवारी (दि. १६) दुपारी मल्हार चौक ते कायनेटीक चौक दरम्यान साक्षी हॉटेलसमोर घडली. मारहाणीत जखमी झालेले व्यावसायिक संतोष ज्ञानेश्वर काटपेलवार (वय ४९ रा. दौंड रस्ता, नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी शुभम लोळगे (रा. दत्त डेअरी शेजारी, कायनेटीक चौक, नगर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. संतोष यांचा भाजीपाला विक्रीचा व्यवसाय आहे. ते हातगाडीवर भाजीपाला विक्री करत असतात. मंगळवारी दुपारी ते हातगाडी घेऊन मल्हार चौकातून कायनेटीक चौकाकडे जात असताना साक्षी हॉटेलसमोर शुभम याने त्यांच्याकडून काकडी घेतली. संतोष यांनी त्याला काकडीचे पैसे मागितले असता त्याने शिवीगाळ केले. घरून कुऱ्हाड घेऊन येत संतोष यांच्या हातगाडीवर दोन घाव घालून दहशत निर्माण केली. संतोष यांना लाथाबुक्क्यांनी व कुऱ्हाडीच्या दांडक्याने मारहाण करून जखमी केले. त्यांच्या खिशातील एक हजार ८०० रूपये व आधारकार्ड बळजबरीने काढून घेतली. संतोष यांनी जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार घेतल्यानंतर सायंकाळी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



# हरिनाम सप्ताहामुळे नालेगाव भक्तीमय

**समाचार/नगर-दि.१८**

नालेगाव गाडगीळ पटांगण येथे श्री छत्रपती शिवराय तरुण मंडळ व पावन हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने श्रीराम नवमी व हनुमान जयंती निमित्त दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा कार्यक्रम संपन्न झाला. सात दिवस ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती अध्यक्ष दत्तात्रय मुदगल यांनी दिली.

अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यामध्ये दि. १६ एप्रिल रोजी ह भ प दिनकर महाराज चिमणे पैठण, १७ एप्रिल रोजी ह भ प अंकिताताई घुले केज, १८ रोजी ह भ प योगेश महाराज जाधव आळंदी, १९ रोजी ह भ प बापूमहाराज लोंढे आडगाव, २० रोजी ह भ प श्रीराम महाराज मचे तिसगाव, २१ रोजी ह भ प प्रांजलताई जाधव मिरजगाव, २२ रोजी ह भ प मयुरी ताई ब्राह्मणे आळंदी यांची कीर्तन सेवा होणार आहे.

तसेच रेणुका भक्ती भजनी मंडळ रेणुका वाडी यांच्या सहकार्याने दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन सकाळी ९ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, दुपारी ३ ते ५ महिला भजन, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ भजनाचा कार्यक्रम व रोज रात्री साडेआठ ते साडेदहा हरिकीर्तन सोहळा होणार आहे, दि. २३ रोजी नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने गावातून दिंडी प्रदक्षिणा सोहळा होणार आहे सकाळी ११ ते १ ह भ प मारुती महाराज झिरपे चापडगाव यांचे जाहीर काल्याचे किर्तन होणार आहे, माजी आमदार अरुण जगताप व आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते महाआरती व महाप्रसादाचे वाटप होणार आहे.

### वनाजी राऊत यांचे निधन

**समाचार/नगर-दि.१८**



वनाजी चुनीलाल राऊत यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. राऊत हे, साहित्यिक, भिंगार माळी समाजाचे विश्वस्त सुनिल राऊत व अजय राऊत यांचे वडील होत. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अंत्यविधीस विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होत.

# कामचुकार कर्मचाऱ्यांची आयुक्तांकडून खरडपट्टी

**समाचार/नगर-दि.१८**



मनपा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी सकाळी अचानक दुचाकीवर शहरात फेरफटका मारत शहर स्वच्छतेची पाहणी करत नाराजी व्यक्त केली, या पुढील काळात नगर शहरातील स्वच्छता १०० टक्के झाली पाहिजे व कचऱ्याचे संकलन देखील पूर्ण क्षमतेने उचलले गेले पाहिजे अन्यथा अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई केली जाईल असा कामचुकार कर्मचाऱ्यांना सज्जड इशारा देत आयुक्त जावळे यांनी कारवाईचे संकेत दिले. तसेच गणवेश न वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांना ५०० रुपयांचा दंड करण्यात आला. यावेळी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत .शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी महापालिकेची असून नागरिकांनी ओला व सुका कचरा घंटा गाडीतच टाकावा महापालिकेच्या विरोधात नागरिकांच्या काही तक्रारी असल्यास स्वच्छता निरीक्षक विभाग प्रमुख यांच्या कडे नोदवावी. निश्चितच त्याचे निराकरण केले जाईल. अशी माहिती आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी दिली.

आयुक्त डॉ. जावळे यांनी दुचाकीवर शहर स्वच्छतेची पाहणी केली. यावेळी घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. डॉ. जावळे यांनी दुचाकीवर स्वच्छतेची पाहणी करत असल्याची माहिती अधिकारी कर्मचारी यांना समजल्यानंतर सफाई कर्मचारी ठिकठिकाणी रस्त्यावर साफसफाई करत असल्याचे दिसत होते.आयुक्त पंकज जावळे यांनी कर्मचाऱ्यांना चांगले धारेवर धरत आपल्या कामाची, जबाबदारीची जाणीव करून दिली.

### अशोका आर्ट इन्स्टिट्यटच्या विद्यार्थ्यांचा चित्राविष्कार

# वारली चित्रातून साकारले रामायणातील प्रसंग

**समाचार/नगर-दि.१८**

नगरच्या अशोका आर्ट इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी सामूहिकरीत्या रामायणातील विविध प्रसंग वारली चित्राच्या माध्यमातून साकारले आहेत.



भव्य तीन फूट बाय ४० फूट मापाच्या भव्य चित्रात श्रीरामाचा जन्म, श्रीराम आणि लक्ष्मण यांनी गुरुगृही घेतलेले शिक्षण, सीता स्वयंवर प्रसंगी शिवधनुष्य उचलण्याचा प्रसंग, भव्य राम-सीता विवाह, याप्रसंगी अवकाशातून पुष्पवृष्टी करणारे देववृंद, आनंद व्यक्त करणारी प्रजा, श्रीराम- सीता यांचे वनवास प्रस्थान, सीता हरण, जटायुवध, महाबली हनुमाने केलेले लंका दहन, सुग्रीव - बाली युद्ध, संजीवनी पर्वत आणणारे सामर्थ्यशाली हनुमान, श्रीराम आणि रावण यांचा युद्ध प्रसंग, श्री राम-सीता यांचा आयोध्या प्रवेश, आणि लव -कुश यांचा जन्म असे विविध प्रसंग विद्यार्थ्यांनी या भव्य चित्रात दर्शविले आहेत.

वारली चित्रातील विविध आकारांचा उपयोग करून श्रीरामाचे चित्र मध्यावर रेखाटले आहे. फक्त पांढर्या रंगाचा उपयोग करून गडद रंगाच्या पेपरवर हे भव्य समूह चित्र अशोका आर्ट इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी आठ दिवसात साकारले आहे.

इन्स्टिट्यूटच्या संचालिका हर्षदा डोळसे, प्रियंका लांडे, सानिका क्षीरसागर, अथश्री कोदे, समीक्षा तोडकर, समिधा राजपूत, श्रद्धा डोळसे, दूर्वा हजारे, अविष्कार पुरोहित, शृंगार पर्वत, भालेकर अथर्व, स्वरा हिवाळे, अन्वी खरमाळे, अनुजा रासकर, शौर्य थोरात, निलाक्षी वामने, रिधिमा, अद्रिता पालवे, नक्षीता, आणि श्रीया कुलकर्णी आदी विद्यार्थ्यांनी या समूह चित्रातून आपला चित्राविष्कार दर्शविला आहे. या कला उपक्रमासाठी कलाशिक्षक व चित्रकार अशोक डोळसे यांनी मार्गदर्शन केले आहे.

**समाचार**

वाचकांना नम्र सूचना

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



## हनुमान चालिसा

**मंगल भक्त सेवा मंडळ**
गुरुवार, दि. १८ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**अशोक दत्तात्रय शहापुरे**
राम मंदिर, चिन्मय हौ.सो., पंचवटीनगर, पाईपलाईन रोड

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडल**
गुरुवार, दि. १८ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**श्र. रामचंद्रजी पर्वते**
नानाजी नगर, सासरनगर, अहमदनगर

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**
गुरुवार, दि. १८ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**लकीशेठ वाही**
विराज इस्टेट, साईदीप हॉस्पिटल मागे, तारकपुर, अहमदनगर

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)**
गुरुवार, दि. १८ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**लखमीचंदजी जग्गड परिवार**
शिवालय, नगर वाचनालय समोर, नेता सुभाष चौक

## मुंबई शेअर भाव

**क्रूडच्या भावात घट परिणामी सेन्सेक्स २०० अंकांची तेजी मंदी**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१
**दिनांक १८-४-२०२४**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७३१३० |
| एसीसी | २४५१-५२ |
| एशियन पेंट | २८३६-३७ |
| बजाज ऑटो लि. | ९०७४-७५ |
| बलराम फूड चिनी | ३७३-७४ |
| भारत फोर्ज | ११९०-९१ |
| क्रॉम्प्टन | २९६-९७ |
| डीएलएफ | ८७३-७४ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ६०५३-५४ |
| ग्रॅफाईट इंडिया | ६७९-८० |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२२५-२६ |
| आयटीसी लि. | ४२३-२४ |
| एल अँण्ड टी लि. | ३५७४-७५ |
| रिलायन्स इंड. | २९४६-४७ |
| एसबीआय | ७५१-५२ |
| टाटा मोटर्स | ९८८-८९ |
| टाटा स्टील | १६२-६३ |
| टीसीएस | ३८८८-८९ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २५१-५२ |
| सुवेन फार्मा | ६४७-४८ |

# केडगावला कीर्तन महोत्सवाचा समारोप

**समाचार/नगर-दि.१८**



केडगाव मधील कीर्तन महोत्सवाचा भक्तीमय वातावरणात हजारो भाविकांच्या उपस्थितीत समारोप झाला. गुढी पाडव्यानिमित्त पाच गोडाऊनच्या प्रांगणात जनसेवक अमोल येवले मित्र मंडळ व छत्रपती फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या माध्यमातून कीर्तन महोत्सव रंगला होता. किर्तन महोत्सवाचे हे तिसरे वर्ष होते. शिवसेना शहरप्रमुख दिलीप सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी काल्याचे कीर्तन केले.

शर्मा महाराज म्हणाले की, परमार्थाशिवाय जगात काहीच नाही. पूर्वीच्या काळात माणसे वाईट वागत नव्हती, त्यामुळे त्याना चांगलं वागा शिकवायची गरज भासत नव्हती. या कलीयुगात कीर्तन, प्रबोधन, विचारवंतांच्या प्रबोधनानंतरही समाजात अपेक्षित बदल दिसत नाही. दिलीप सातपुते म्हणाले की, जनसेवक अमोल येवले मित्र मंडळ व छत्रपती फाउंडेशन समाजात संस्कार रुजविण्याबरोबर सामाजिक दिशा देण्याचे काम करत आहे. दरवर्षी केडगावकरांना कीर्तन महोत्सवाची पर्वणी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. माजी नगरसेवक अमोल येवले यांनी केडगावकरांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल सर्वांचे आभार मानले. या समारोपीय किर्तन महोत्सवासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके, माजी महापौर भगवान फुलसौदर, बाळासाहेब बोराटे, किरण काळे,मा नगर सेवक विजय पठारे, माजी नगरसेवक संग्राम कोतकर,विठ्ठल कोतकर, अजित कातोरे, ह.भ.प. क्षीरसागर महाराज, ह.भ.प. भाकरे महाराज, ह.भ.प. बोरकर महाराज, गारुडकर सर, ओंकार सातपुते आदींसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वेदमंत्राच्या घोषाने परिसर दुमदुमला : चिकूची आरास

# मोहटा गडावर वासंतिक नवरात्राची सांगता

**समाचार/नगर-दि.१८**

श्री मोहटादेवी देवस्थान येथे वासंतीक नवरात्र उत्सवाची सांगता पारंपारिक उत्सवात व वेदमंत्राच्या जयघोषात झाली. राज्याच्या विविध भागातून हजारो भाविकांनी दिवसभरात भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. सप्तशती पाठांची पूर्णाहुती होम हवनाने झाली.

देवस्थानचे विश्वस्त तथा गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, रंजना कांबळे, विश्वस्त ॲड. विक्रम वाडेकर, पूजा वाडेकर यांच्या हस्ते देवीची महापूजा, होमहवन करून वेदमंत्राच्या घोषाने परिसर दुमदुमला. देवस्थानमार्फत वासंतीक, शारदीय व शाकंभरी अशी तीन नवरात्र साजरे होतात. विश्वशांती व संपूर्ण भारतवासी यांचे कल्याण व्हावे असा महासंकल्प करण्यात आला व विधिवत यज्ञविधी संपन्न झाला. श्री मोहटादेवी व श्री प्रभू रामचंद्राची विश्व कल्याणर्थ प्रार्थना करून श्रीराम नवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. उत्सवामध्ये रोज पारंपारिक उत्सव, त्रिकाळ आरत्या, सुवासिनी पूजन, कुमारिका पूजन, अन्नदान झाले. औरंगाबाद, बीड, पुणे, नाशिक, कल्याण, मुंबई व राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



श्रीराम जन्मोत्सवानिमित्त हिंगणगाव येथील भाविक प्रा.छबन झावरे यांनी चिकुच्या फळाची आरस अर्पण केली.

मंदिर व मंदिर परिसरातील योगिनी, दशमहाविद्या इ. देवतेस वर्धापन दिनानिमित्त अभिषेक, पुष्पहार, सवाद्य नैवेद्य अर्पण करून विधिवत पूजा सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी संस्थानचे विश्वस्त बाळासाहेब दहिफळे, जालना येथील उत्पादन शुल्क जिल्हा अधीक्षक नवलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, नगर येथील व्यापारी हीरालाल शर्मा, पापालाल लड्डा, ग्रामस्थ, भाविक भक्त व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी दिली.




# हरदिन मॉर्निंग ग्रुपतर्फे वराडे, घाडगे यांचा गौरव

**समाचार/नगर-दि.१८**

भिंगारच्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आंतरराष्ट्रीय धावपटू पूजा रमेश वराडे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करुन पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल तिचा व ग्रुपचे सदस्य ज्यौतिषाचार्य तुषार घाडगे यांना ज्योतिष क्षेत्रातील ज्योतिष महामेरु व ज्योतिष शिरोमनी राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

भगवान गौतमबुध्द जॉगींग पार्कमध्ये वराडे व घाडगे यांचा सत्कार महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष नंदकुमार झंवर व उद्योजक लॉरेन्स स्वामी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सुमेश केदारे, दिलीप ठोकळ, सर्वेश सपकाळ, दीपक बडदे, जहीर सय्यद, अभिजीत सपकाळ, दीपक धाडगे, दिलीप गुगळे, शामराव वाघस्कर, विकास भिंगारदिवे, विठ्ठल राहिंज, अशोक लोंढे, रमेश वराडे, नामदेवराव जावळे, सुनिता वराडे, प्रांजली सपकाळ, मनीषा शिंदे, सुरेखा आमले, राजश्री राहिंज, वेणूताई इस्सर, मीनाताई परदेशी, सुधाताई जावळे, मीनाताई ससाणे, डॉ. सुचेता मांजरे, निर्मला पांढरे, मीनाताई रासणे आदींसह ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजय सपकाळ, रमेश त्रिमुखे, अरविंद ब्राम्हणे, सचिन चोपडा, संजय भिंगारदिवे, अजय खंडागळे यांची भाषणे झाली.

# देशात लवकरच रामराज्य नांदणार- गंधे




**समाचार/नगर-दि.१८**

श्रीराम जन्मभूमी अयोध्येत श्रीरामाचे मंदिर झाले आहे. त्यामुळे यावर्षीच्या श्रीराम जन्मोत्सवास अनन्यसाधारण महत्व आहे. अयोध्येत श्रीरामाच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचे ५२७ वर्षानंतर देशातील सर्व हिंदू समाजचे स्वप्न साकार झाले आहे. त्यामुळे सर्वाना सुख देण्यासाठी आता देशात लवकरच रामराज्य नांदणार हे नक्की, असा विश्वास नगर शहर विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्रभैय्या गंधे यांनी व्यक्त करत नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चाचे उपाध्यक्ष अमोल निस्ताने यांच्या वतीने बुरुडगल्ली भागात श्रीराम नवमीनिमित्त आयोजित कार्यक्रमात गंधे यांच्या हस्ते श्रीरामच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.

यावेळी भाविकांना प्रसादाचे वाटपही गंधे यांच्या हस्ते झाले. यावेळी बाबासाहेब सानप, संतोष गांधी, महाविर कांकरीया, सुमित बटुळे, लक्ष्मीकांत तिवारी, नितिन जोशी, अण्णा घोलप, लिला अगरवाल, कालिंदी केसकर, श्वेता झोंड, कुसुम शेलार, वर्षा गांधी, सिध्देश नाकाडे, चिन्मय खिस्ती, अभिषेक वराळे, जे.के.पापडेजा, व्यंकटेश बोमादंडी, श्रीकांत फंड आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.प्रास्ताविकात अमोल निस्ताने यांनी केले.

# ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाला शब्बीर शेखकडून पुस्तके भेट

**समाचार/नगर-दि.१८**

जेष्ठ ग्रंथ संग्राहक, इतिहास अभ्यासक, अनुवादक शब्बीर शेख यांनी १ लाख ४२ हजार १२ रुपये किंमतीची २ हजार ३१६ पुस्तके अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाला देणगी दाखल दिली. यामध्ये अभ्यासकांना, संशोधकांना उपयुक्त पडणारी पुस्तके आहेत.

शब्बीर शेख जिल्ह्यातील लेखक, कवी, अनुवादक संपादक, संकलक यांचा परिचय व त्यांच्या साहित्य कृतींची सूची २५५० लोकांची व ६५०० पुस्तके असलेली सूची व ए ४ साईजची १३५० पानी प्रकाशनाच्या



मार्गावर आहे. शब्बीर भाईची एक सूची, एक अनुवादित मराठी कादंबरी व एक हिंदी अनुवादित कथा संग्रह प्रकाशित झालेला आहे. दोन अनुवादित कथासंग्रह, चार अनुवादित कांदबरी प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

यावेळी वस्तू संग्रहालयाचे डॉ. साताळकर, डॉ. संतोष यादव व नारायण आव्हाड तसेच संग्राहक पंकज मेहेर, गड किल्ले अभ्यासक ठाकुर

# पर्यावरण संरक्षक जय भवानी संस्था

## लोकसेवार्थ



आजच्या काळातील तरुण हे बव्हांशी व्यसनाधीनतेमध्ये गुंतलेले दिसतात. मात्र आपल्या याच समाजात काही तरुण मात्र स्वयंप्रेरणेने विधायक सामाजिक कार्यामध्ये स्वतःला वाहून घेतात तेव्हा ते समाजासाठी एक नवा आदर्श उभा करतात. पिंपळगाव जलाल (ता. येवला, जि. नाशिक) येथील उपक्रमशील तरुणांचा गट गेल्या १६ वर्षांपासून सामाजिक उपक्रमांत सक्रिय आहे. हे तरुण २०१९ पासून 'जय भवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्थेच्या माध्यमातून ग्रामविकासात कार्यरत आहेत. जनजागृती व लोकसहभागातून ग्रामीण भागातील विकास शक्य असल्याची संस्थेची भावना आहे. पिंपळगाव जलाल येथील प्रयोगशील तरुण शेतकरी विजय दत्तू भोरकडे हे जय भवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष आहेत. गेल्या १६ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन ते करत आहेत. सुरुवातीला पर्यावरण या विषयावरील उपक्रम राबवून कामाची सुरवात झाली. त्यातूनच सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्यातून अनेक तरुण कार्यकर्ते जोडले गेले. याच ताकदीवर संस्थेने राज्यभरात विधायक कामे यथाशक्ती करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभाग व त्यास श्रमदानाची जोड दिली आहे. कृषी, पर्यावरण, आरोग्य व जलसंधारण अशा प्रमुख विषयांवर जय भवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्था' कार्य करत आहे. यामध्ये कुठलीही आर्थिक मदत न घेता सदस्यांच्या वर्गणीतून कामांसाठी ते खर्च करतात. देशी वृक्षसंपदा वाढीसाठी पुढाकार संस्थेची वाटचाल सुरू होण्याच्या अगोदरपासून कार्यकर्ते वृक्ष लागवडीसाठी आग्रही होते. दरम्यान, २०१७ पासून दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत होत्या. याचे प्रमुख कारण म्हणजे घटलेले पर्जन्यमान आणि वृक्षतोड हे होते. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने संस्थेने या विषयाकडे प्राधान्याने लक्ष वेधले. यासाठी राज्याच्या विविध ऐतिहासिक ठिकाणी सायकल यात्रेचे आयोजन करून जनजागृती करण्यास सुरुवात केली. यात्रेदरम्यान मार्गात ठिकठिकाणी रानमाळावर कमी पाण्यात तग धरणाऱ्या आणि सावली देणाऱ्या देशी वृक्षांची लागवड करण्यासाठी विशेष पुढाकार घेतला. यामध्ये वड, पिंपळ, कडुनिंब, पळस, आपटा, हिरडा, बेहडा, रेन ट्री, जांभूळ सीताफळ आदी विविध जंगली आणि औषधी वनस्पतीच्या बियांचे लाखो 'सीडबॉल' तयार करून जागोजागी मातीआड पुरून बीजारोपण केले आहे. यासह बियाण्यांचे वितरण पर्यावरणप्रेमी व विद्यार्थ्यांना करण्यात येत असते. पावसाळ्यात संस्थेमार्फत 'माझे झाड – माझा सेल्फी' या उपक्रमांतर्गत प्रत्येकाकडून किमान एक झाड लावून त्यांचे संगोपन करण्यावर भर दिला जातो. सायकल यात्रेतून सामाजिक जनजागृती दरवर्षी संस्थेतर्फे विविध ऐतिहासिक ठिकाणी सायकल यात्रेचे आयोजन केले जाते. सायकल फेरीत विविध सामाजिक संदेश देणारे फलक लावून जनजागृती केली जाते. त्यामध्ये बेटी बचाओ, बेटी पढाओ, सायकल चालवा–देश वाचावा, पाणी आडवा–पाणी जिरवा, रक्तदान– सर्व श्रेष्ठ दान, वृक्षारोपण करा–वसुंधरा समृद्ध करा', यांसह कायदेविषयक जनजागृतीचे असे विविध संदेश दिले जातात.


## अपग्रेड तर्फे आर्थिक वर्ष २४ च्या अखेरीस ५५,००० नोकऱ्या

upGrad दखल

अपग्रेड या आशियातील सर्वांत मोठ्या एकात्मिक अध्ययन, कौशल्यविकास आणि मनुष्यबळ विकास कंपन्यांमध्ये गणल्या जाणाऱ्या कंपनीने वार्षिक प्लेसमेंट्स (नोकऱ्या) आणि ट्रांझिशन्स (नोकऱ्यांत बदल) यांमध्ये स्थिर वाढ साध्य करत एका वर्षांत ५५,००० नोकऱ्या सादर केल्या. कंपनीकडे शिकणाऱ्यांनी नवीन नोकऱ्या, करिअरमधील बदल आणि पदोन्नती यांच्या माध्यमातून सुमारे ३००० राष्ट्रीय व जागतिक कंपन्यांमध्ये नोकऱ्या प्राप्त केल्या आहेत. त्यांचे वार्षिक वेतन (सीटीसी) ४.५ लाख रुपये ते १.८० कोटी रुपये या दरम्यान आहे. आर्थिक वर्ष'२४ मध्ये अपग्रॅडच्या उद्योग शाखेने सुमारे ६००,००० कॉर्पोरेट व्यावसायिकांना नवीन कौशल्ये शिकवली तसेच प्रशिक्षण दिले.


## शब्दखेळ – १५२

खाली दिलेल्या चौकोनात १० शीतपेयांची नावे लपलेली आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रे | कृ | मी | रिं | डा | र | का | को |
| ड | थ | म्स | अ | प | न | से | का |
| बु | यु | ढ | क्रो | त्र | पे | व | को |
| ल | नी | स | स | गी | ली | न | ला |
| स | बॉ | सा | पा | फाँ | क | अ | ट |
| लि | ल | रा | फ | टा | न | पृ | स्प्रा |
| म्का | प्सी | झा | य | ल | ट | ण | ई |
| ळी | पे | मा | र | मे | न | दा | ट |

### शब्दखेळ – १५१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | दी | पा | व | ली | चि | बी | र |
| म | सं | ग | स | न | न | रं | क्षा |
| न | क्रा | णे | ळ | व | मे | ग | बं |
| व | त | शो | शी | रा | को | पं | ध |
| मी | सु | त्स | य | त्री | थिं | च | न |
| ज | जी | व | जा | ग | बी | मी | सं |
| य | व | ट | पौ | र्णि | मा | दे | हो |
| अं | द | ही | का | ला | त्र | श | ळी |

# शालेय विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणासाठी सीएफटीआयचा एमटूएम फेरी उपक्रम

## अक्षरधारा

एमटूएम फेरी अर्थात भारतातील एक अग्रगण्य अशी समुद्रातील बोट सेवा असून याच बोट सेवेच्या सहकार्याने सीएफटीआय या सामाजिक संस्थेने अलिबाग मांडवा येथील शाळेत जाणाऱ्या मुलांना अधिक सक्षम बनविण्यासाठी एक उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून एमटूएम फेरीने मांडवा येथील वंचित शाळेतील मुलांना सुमारे १२० शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य असलेल्या किट्सचे वाटप केले. प्रत्येक मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता आवश्यक आहे. मात्र अलिबाग मांडव येथील अनेक शालेय विद्यार्थी अगदी मूलभूत शालेय साहित्यापासून वंचित होते. आर्थिक अडचणीमुळे




अनेक शालेय मूलं शाळा सोडतात आणि त्यामुळेच ते उज्ज्वल भविष्यापासून वंचित राहतात. या सामाजिक समस्येचे निराकरण करण्यासाठीच एमटूएम फेरी या बोट सेवेने सीएफटीआयसारख्या सामाजिक संस्थेच्या समन्वयातून मांडवा येथील सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य असलेले किट्स वाटण्याची मोहीम सूर केली. या उपक्रमाच्या माध्यमातून ही मुलं शिक्षणाच्या बाबतीत सक्षम बनून त्यांचे पुढील आयुष्यासाठीचे भविष्याचे निर्णय घेण्यास देखील ते तयार होतील. ''एमटूएम फेरी या उपक्रमात समाजातील वंचित शालेय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणाचा मूलभूत अधिकार देण्यासाठी आणि त्यांना पाठिंबा देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. या मुलांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासात आमचे छोटेसे योगदान देण्याचा हा प्रयत्न आम्ही करतो. या आर्थिक दुर्बल घटकातील शालेय विद्यार्थ्यांना हे शालेय साहित्य वाटप करून शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहित करणे हा आमचा हेतू आहे .'' असे एमटूएम फेरीच्या सीईओ देविका सैगल कपूर यांनी सांगितले.

लोकजागर

संकलन–संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

### केबल व चित्रपटगृह चालकांची बैठक

# निवडणूक जाहिराती प्रदर्शित करण्याचे निर्देश

**समाचार/नगर-दि.१८**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात जिल्ह्यातील केबल व चित्रपटगृह चालकांची बैठक झाली. निवडणूक कालावधीत आदर्श आचार संहितेचा भंग होणार नाही याची काळजी घेत जाहिराती प्रदर्शित करण्याचे निर्देशही यावेळी अपर जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीस सहायक करमणूक शुल्क अधिकारी किरण देवतरसे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ.रवींद्र ठाकूर, डॉ. अमोल बागुल यांच्यासह जिल्ह्यातीलकेबल व चित्रपटगृह चालक उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी म्हणाले की, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक कालावधीत राजकीय पक्षांचे व उमेदवारांचे प्रचार साहित्य माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. समितीकडून प्रमाणित करून घेण्यात आलेले साहित्यच केबल व चित्रपट गृहातून प्रसिध्द होईल याची दक्षता घ्यावी. मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्यादृष्टीने मतदार जागृतीच्या व्हिडिओचे अधिकाधिक प्रसारण करण्यात यावे. आदर्श आचार संहितेचा भंग होणार नाही याची काळजी घेत जाहिरातीचे प्रसारण करण्याच्या सूचनाही अपर जिल्हाधिकारी श्री मापारी यांनी उपस्थित केबल व चित्रपटगृह चालकांना यावेळी दिल्या.



## गोंदवलेकर महाराज मंदिरात राम जन्मोत्सव साजरा

**समाचार/नगर-दि.१८**

आज माणसाच्या नैतिक अध:पतनाने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. कोणतीही अपराधी भावना न बाळगता आपण आपल्या दुर्गुणांचे गुलाम बनत आहोत. माणूस म्हणून जन्म घेण्याचे सौभाग्य लाभले असताना आत्मपरिक्षण करुन दोषांवर मात करावा. धर्माच्या मार्गावर चालावे, त्यामुळेच मानवी जीवन हितकारक होईल, प्रत्येक व्यक्तीमत्वात राम समाविष्ट आहे, तो पहाण्याचा प्रयत्न करावा, असे निरुपण हभप प्रसाद देव यांनी केले.

सावेडी उपनगरात शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या मंदिरात श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी हभप प्रसाद देव, सुंदरदास रिंगणे, रेखाताई रिंगणे, सेवाभावी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

रामजन्मावर हभप प्रसाद देव यांनी निरुपण करतांना सांगितले की, संयम आणि प्रामाणिकपणे सतत केलेल्या प्रयत्नांनी आपण आपल्या अंत:करणातील राम जागृत करु शकतो. रामाची नैतिक मुल्ये आपल्या जीवनात सजवण्याचा प्रयत्न करुन रामभक्त आहोत हे सिद्ध करण्याची वेळ आली आहे. ज्या दिवशी आपण हे सिद्ध करु त्या दिवशी रामलल्लाच्या मुर्तीचे सौंदर्य हजरोपटीने प्रकाशमय होऊन अधिक खुलून दिसेल, असे त्यांनी सांगितले.

या रामजन्म सोहळ्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. भाविकांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला.

### हिवरेबाजारमध्ये श्रीरामकथा निरूपण सप्ताह

# रामकथेमुळे माणुसकी रुजते - भास्करगिरी महाराज

**समाचार/नगर-दि.१८**

रामकथेमुळे माणसाच्या अंतःकरणात खऱ्या अर्थाने माणुसकी रुजते. घरापुरती,गल्लीपुरती,देशापुरती भावना न राहता संपूर्ण विश्वाचे कल्याण कसे करता येईल व विश्वामध्ये राहणारे अनेक स्त्री-पुरुष,सर्व जातीधर्मातील बांधव हे केवळ मानवतेच्या नात्याखाली कसे आणता येतील याची प्रेरणा मिळते व राम कथा आपल्याला त्याग आणि समर्पण शिकवते,असे प्रतिपादन श्रीक्षेत्र देवगड देवस्थानचे महंत ह.भ.प. भास्करगिरीजी महाराज यांनी हिवरे बाजार येथे अयोध्या स्थित प्रभू श्रीराम मूर्ती शिलांस स्थापने निमित्त आयोजित रामकथेत व्यक्त केले.




नगर तालुक्यातील आदर्शगाव हिवरे बाजारमध्ये प्रभू श्रीराम मूर्ती शिलांश स्थापने निमित्त श्रीराम कथा निरुपण सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. त्याचा शुभारंभ भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.आदर्श गाव हिवरे बाजार येथे होत असलेली श्री राम कथा मंगलमय वातावरणात पार पडत असून या कथा श्रवनातून नव्या पिढीला हे क्षण सुवर्णअक्षरांनी लिहून ठेवावे असे वाटतील, असे गौरवोदगार व्यक्त करून भास्कगिरी महाराज म्हणाले, वडिलांची इच्छा हा आदेश मानून प्रभु श्रीरामचंद्र यांनी सिहासनाचा त्याग करून वनवासाचा मार्ग स्वीकारला. दीनदुबळे व आदिवासींना जवळ केले. वानरसेना उभी करून रावणाचा नाश केला.श्रीराम चरित्रातून शौर्यासह त्याग व समर्पणाचाआदर्शघेतला पाहिजे.भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते श्रीराम मूर्ती शिलांश स्थापना, वीणा पूजन, व्यासपीठ उद्घाटन करण्यात आले. ह.भ.प. समाधान महाराज, योगी निरंजननाथ शांतीनाथ महाराज,ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज वीर (व्यवस्थापक आळंदी देवस्थान), ह.भ.प. अमित महाराज धाडगे,पद्मश्री पोपटराव पवार,हिवरे बाजारच्या सरपंच विमल ठाणगे,वि.का.से.सो. संस्थेचे अध्यक्ष छबुराव ठाणगे व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी हिवरेबाजार व पंचक्रोशीतील भाविक उपस्थित होते.

### राष्ट्रवादी महिला काँग्रेसतर्फे रामनवमी साजरी

# प्रभू श्रीरामांचे विचार प्रेरणादायी - जगताप

**समाचार/नगर-दि.१८**

भारतवासीयांचे अनेक वर्षाचे राम मंदिराचे स्वप्न अखेर पूर्ण झाले असल्यामुळे समाजामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. प्रभू श्रीराम यांचे विचार समाजाला प्रेरणा देणारे असून त्या माध्यमातून चांगले काम करण्याची ऊर्जा आपल्या सर्वांना मिळत असते. धार्मिक,अध्यात्मिक तेथून सुसंस्कृत पिढी निर्माण होत असते. अयोध्येत राम मंदिराची निर्मिती झाल्याने यंदा रामनवमीला विशेष महत्व प्राप्त झाले, ठिकठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.




राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री प्रभू श्रीराम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आ.संग्राम जगताप, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शहर जिल्हाध्यक्ष रेश्मा आठरे, कार्याध्यक्ष अभिजीत खोसे खोसे, विधानसभा अध्यक्ष सुमित कुलकर्णी, राष्ट्रवादी युवक अध्यक्ष केतन क्षीरसागर, युवराज शिंदे,माजी सभापती अविनाश घुले, सुरेश बनसोडे, चेअरमन नवनाथ वाघ, सोमनाथ तांबे,रवी दंडी, अजय भोसले, ऋषिकेश जगताप, निर्मला जाधव ,सुनिता पाचारणे, वृषाली सातारकर, अर्चना परकाळे, शितल गाडे, शितल राऊत, गीता कामत, सुवर्णा गिऱ्हे, अपर्णा पालवे, शालिनी राठोड, अलिषा गर्जे, लता गायकवाड ,सुजाता दिवटे, स्नेहल गीते, नंदा पांडुळे आदि उपस्थित होते.

राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या सर्व महिलांनी एकत्र येत विविध धार्मिक कार्यक्रम घेत श्रीराम नवमी उत्साहात साजरी केली तसेच स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रभू श्रीराम यांचे विचार आजच्या पिढीने आत्मसात केले पाहिजे असे मत रेश्मा आठरे यांनी व्यक्त केले.



## रामवाडीत भंडाऱ्याचे घरोघरी वाटप

**समाचार/नगर-दि.१८**

शहरातील रामवाडी मित्र मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणुकीला फाटा देवून रामवाडी परिसरातील नागरिकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या भंडारा वाटपाचे प्रारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. परिसरातील नागरिकांना घरोघरी या भंडाऱ्याचे वाटप करण्यात आले.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास आमदार जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मावळा प्रतिष्ठानचे निलेश म्हसे पाटील, सुरेश बनसोडे, विकी इंगळे, सागर मुर्तुडकर, प्रकाश वाघमारे, सागर साठे, रामवाडी मित्र मंडळाचे अध्यक्ष सतीश साळवे, नितीन कसबेकर, नितीन साळवे, सुरेश वैरागर, दीपक सरोदे, दीपक साबळे, अश्विन खुडे, संकेत लोखंडे, पप्पू पाथरे, गणेश ससाणे, राजू कांबळे, दीपक लोखंडे, बंटी साबळे, मयूर चखाले, अजय केंजरला आदी उपस्थित होते.आ. जगताप, सतीश साळवे यांची भाषणे झाली. या उपक्रमासाठी स्थायी समितीचे माजी सभापती सचिन जाधव यांचे सहकार्य लाभले.

# तरूणास जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण

**समाचार/नगर-दि.१८**

रस्त्यावर उभी केलेली दुचाकी बाजूला घेण्यास सांगितल्याच्या रागातून तरूणाला जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. रवी सीताराम जाधव (वय २८, रा. केडगाव) असे मारहाण झालेल्या तरूणाचे नाव आहे.

त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गिरीष राजेंद्र शर्मा (रा. भूणनगर, केडगाव) याच्या विरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रवी त्यांच्या दुचाकीवरून १४ एप्रिल रोजी रात्री घरी जात असताना साडेसात वाजता भूषणनगर येथील अजिंक्य कॉलनीत गिरीष याने त्याची दुचाकी रस्त्यावर उभी केली होती. रवी यांनी त्याला दुचाकी बाजूला घेण्यास सांगितली असता त्याला राग आल्याने त्याने मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केली. रवी व त्यांचे नातेवाईक गिरीषला समजून सांगण्यासाठी गेले असता असता त्याने दगड उचलुन शिवीगाळ व दमदाटी केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# डॉ. आंबेडकर जयंती मिरवणुकीत डिजे वाजवल्याप्रकरणी ३६ जणांवर गुन्हा

**समाचार/नगर-दि.१८**

रविवार (दि. १४ एप्रिल) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नगर शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीत विविध मंडळांनी डीजे सिस्टीम लावून कर्णकर्कश आवाजात गाणी वाजवून ध्वनी प्रदुषण केले. याप्रकरणी मंडळ अध्यक्ष व डीजे मालक,चालक अशा ३६ जणांविरूध्द तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अंमलदार रावसाहेब खेडकर यांच्या फिर्यादीवरून १८ जणांवर तोफखाना पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये शुभम बडेकर, तुषार दत्तात्रय कुरूमकर, विशाल गायकवाड, अक्षय अर्जुन सांळुके, विनित दिलीप पाडळे, प्रतिक राजु तेलंगी, पंकज दिवे, विशाल विनोद साळे, संदीप सुभाष जाधव, सुनील सदाशिव साळवे, अक्षय अशोक काळे, किरण शिंदे, शुभम संतोष जाधव, आकाश सुधीर सरोदे, शेख अमजद रज्जाक, सागर अनिल पाथरे, अक्षय विठ्ठल शिंगणे, विनोद विठ्ठल भिंगारदिवे यांचा समावेश आहे. पोलीस अंमलदार रामनाथ हंडाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सहा जणांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये सिध्दांत संजय कांबळे, सिताराम किसन शिंदे, नितीन रावसाहेब सुर्यवंशी, अंजिक्य रमेश पोते, दीपक बुध्दा लोढे, गणेश बाबासाहेब वारे यांचा समावेश आहे.

पोलीस अंमलदार सचिन लोळगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चार जणांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये अक्षय दशरथ पाचारणे, अमिर मुलाणी, राजकुमार माधवराव कांबळे, रवींद्र रामेश्वर पवार यांचा समावेश आहे. पोलीस अंमलदार अनुप झाडबुके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आठ जणांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये सतिष सुधाकर साळवे, शेजोर नसिर खान, आकाश लक्ष्मण शिंदे, गौरव महेश काळे, सुजित सुभाष घंगाळे, नदिम नजिर खान, रोहित आव्हाड, देविदास मलु शिंदे यांचा समावेश आहे.

### अडीच तोळ्याचे दागिने, ५० हजाराची रोकड चोरीस

# ताठेमळ्यात व्यावसायिकाचे बंद घर फोडले

**समाचार/नगर-दि.१८**

नगरमधील घर बंद करून मुळ गावी गेलेल्या व्यावसायिकाचे घर फोडून चोरट्यांनी सुमारे अडीच तोळ्याचे सोन्याचे दागिने व ५० हजाराची रोकड, असा एक लाखाचा मुद्देमाल लंपास केला. ७ एप्रिल रोजी दुपारी दीड ते १४ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या दरम्यान सावेडी उपनगरातील भुतकरवाडीच्या ताठे मळ्यात ही घटना घडली.

याप्रकरणी विशाल तुकाराम चव्हाण (वय २८) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात सोमवारी (दि. १५) दुपारी घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल चव्हाण हे ताठे मळ्यातील गोपालधाम सोसायटीमध्ये राहतात. ते ७ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजता घर बंद करून त्यांच्या मुळ गावी औसा (जि. लातुर) येथे गेले होते. त्यानंतर चोरट्यांनी त्यांच्या घराचे कडी कुलूप तोडून कपाटातील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेल्या १६ ग्रॅमच्या चार सोन्याच्या अंगठ्या, दोन ग्रॅमचे सोन्याची कानातील फुले, आठ ग्रॅमचे ब्रेसलेट व ५० हजाराची रोकड, असा एक लाखाचा ऐवज चोरून नेला. सदरची घटना १४ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता लक्षात आली.

त्यानंतर विशाल यांनी तोफखाना पोलिसांना घरफोडी झाल्याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे. अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस अंमलदार जी. जी. गोरडे करत आहेत.

# श्री.गो. विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत नेत्रदीपक यश

**समाचार/नगर-दि.१८**

नुकत्याच झालेल्या एनएमएमएस या शिष्यवृत्ती परीक्षेत श्रीमान गोकुळचंद विदयालयाने नेत्रदीपक यश संपादन केले. शिष्यवृत्ती परिक्षेत साई नारायण कुलकर्णी हा विदयार्थी पात्र झाला असून त्याला दरवर्षी १२ हजार रुपये याप्रमाणे इयत्ता ९ वी ते १२ वी अखेर चार वर्षांसाठी ४८ हजार रुपये विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. सोबतच विद्यालयातील पाच विद्यार्थ्यांस सारथी शिष्यवृत्ती प्राप्त झाली असून त्यामध्ये सायली अरुण घोडेराव,जान्हवी सचिन गुळे, साई दादासाहेब डांगे, पार्थ मच्छिंद्र लोहकणे,सुजल गजेंद्र साबळे हे विदयार्थी पात्र झाले.



या विद्यार्थ्यांना एकूण २ लाख ४० हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पाहुण्यांचे स्वागत उपमुख्याध्यापक रमेश गायकवाड यांनी केले.प्रास्ताविक मुख्याध्यापक मकरंद को-हाळकर यांनी केले. कोपरगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कैलास ठोळे, संस्थेचे सचिव दिलीप अजमेरे यांनी यशस्वी विदयार्थी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्वेता मालपुरे यांनी केले. आभार पर्यवेक्षिका उमा रायते यांनी मानले. या परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त करणाऱ्या या विद्यार्थ्यांना कुलदीप गोसावी ,पंकज जगताप,जी.एन.जाधव, एस.डी. जाधव आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यावेळी संदीप अजमेरे,आनंद ठोळे,डॉ.अमोल अजमेरे,राजेश ठोळे यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २० एप्रिल रोजी मोफत बालरोग तपासणी शिबीर

**समाचार/नगर-दि.१८**

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे शनिवार दि.२० एप्रिल २०२४ रोजी मोफत बालरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत होणाऱ्या या शिबिरात बालरोगतज्ज्ञ डॉ. श्रेयस सुरपुरे, पेडिएट्रिक सर्जन डॉ.रुपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ.सोनाली कणसे, डॉ.वैभवी वंजारे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत बालरोग विभाग कार्यरत आहे. १६ बेडचा अद्ययावत एनआयसीयू याठिकाणी आहे. नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस.(श्वसन दाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक आजार व जन्मजात आजारांचे निदान व उपचार मार्गदर्शन, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, पॅथोलॉजी लॅब २४ तास उपलब्ध आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मशीन्समुळे विविध तपासण्यात अचूकता येण्यास मदत होते. २४ तास तज्ज्ञ डॉक्टर्स बालरोग विभागात कार्यरत आहेत. महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही येथे उपलब्ध आहे. दर शनिवारी मोफत ओपीडी सेवा उपलब्ध असून सोमवार ते शुक्रवार ओपीडी सेवेसाठी नाममात्र रुपये आकारले जातात. हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनव्दारे सेवा उपलब्ध आहे. आनंदऋषीजी ब्लड बँकेची सेवा २४ तास उपलब्ध आहे. महावीर भवन येथे रूग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी ३५ रुपयांत भोजन व्यवस्था आहे. बालरोग शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### जितो युथ विंगचे आयोजन

# परदेशात शिक्षण घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांसाठी रविवारी मोफत कार्यशाळा

**समाचार/नगर-दि.१८**

उच्च शिक्षणासाठी परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या सर्व समाजातील इच्छुकांसाठी जितो अहमदनगर, जितो युथ विंगच्या पुढाकाराने रविवार दि. २१ एप्रिल २०२४ रोजी मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यादिवशी सकाळी ११ वाजता स्टेशन रोडवरील हॉटेल अर्थ बँक्वेट येथे सदर कार्यशाळा होणार आहे. राईज ग्लोबल स्टडी अब्रॉड कन्सल्टन्सीच्या सहकार्याने ही कार्यशाळा होत आहे. यात आंतरराष्ट्रीय करियर कोच क्षमा जैन सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती जितो युथ विंगचे चेअरमन गौतम मुथा यांनी दिली.

JITO YOUTH

नगरमधून शिक्षणासाठी परदेशात जाऊ इच्छिणारे अनेक विद्यार्थी आहेत. या सर्वांना एकाच व्यासपीठावर परदेशातील प्रतिष्ठित विद्यापीठे, तिथले चांगले अभ्यासक्रम, प्रवेश अर्ज , संपूर्ण प्रवेश

प्रक्रिया, शिष्यवृत्ती, जेईएपी शिष्यवृत्ती, क्षिक्षण कर्ज योजना, परदेशात गेल्यावर निवास व्यवस्था, तिथे शिक्षणाबरोबरच नोकरीच्या संधी यासाठी संपूर्ण मार्गदर्शन आणि सहकार्य केले जाईल. इच्छुक व पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना जागेवर ऑफर देण्यात येतील.

परदेशात चांगले शिक्षणासाठी मार्गदर्शन व संपूर्ण सहकार्य या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. नगरमधील विद्यार्थ्यांसाठी एक मोठी सुवर्ण संधी जितोच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन जितो अहमदनगरचे चेअरमन जवाहर मुथा, सेक्रेटरी आलोक मुनोत, सीएफई कन्व्हेनर जितो अपेक्स सुमंगला मुनोत, जितो युथ विंग सेक्रेटरी खुशबू मुनोत, सीएफई कन्व्हेनर रितेश पटवा, सीएई नगर कन्व्हेनर चेतन भंडारी यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी संपर्क: ८६९८६५२७२७

---

### विचार भारतीच्या जन संवाद यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

# नगरच्या विकास मंथनास प्रारंभ

**समाचार/नगर-दि.१८**

लोकसभा, विधानसभा किंवा महानगरपालिका निवडणूक आल्यावर सर्वच राजकीय पक्ष किंवा उमेदवार स्वतः तयार केलेला विकासाचा अजेंडा जाहीर करत असतात. मात्र मतदार संघातील सामान्य जनतेच्या मनातील प्रश्न, कामे व कसा विकास अपेक्षित आहे हे विचारात घेतले जात नाही. त्यांच्या प्रश्नांना वाचा फुटावी तसेच विकासाच्या नवनवीन संकल्पना मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे या उद्देशाने नगरच्या विचार भारतीच्या वतीने जन संवाद हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे.



जन संवाद अभियांची माहिती देताना रवींद्र मुळे म्हणाले, वेगाने विकसित होणाऱ्या भारत देशात आपले अहिल्यानगर मागे न राहता त्याच वेगाने विकसीत नगर घडवू असा निर्धार करत हे जन संवाद अभियान सुरु केले आहे. गेल्या चार दिवसापासून जन संवाद उपक्रमातून विविध क्षेत्रातिल नागरिक, तज्ञ, विचारवंत व अभ्यासू व्यक्तींशी संवाद साधूण्यात येत आहे.या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या नगरच्या विकासासाठी काय अपेक्षा व संकल्पना आहेत याला प्रथमच व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या संकल्पनांचे संकलन करून लवकरच नगरच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट विचार भारती तयार करणार आहे.

जन संवाद उपक्रमा अंतर्गत एमआयडीसी मधील कारखानदार व उद्योजकांची बैठक मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, मराठा चेम्बर ऑफ कॉमर्सचे उपध्यक्ष प्रकाश गांधी, विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी, उद्योजक आनंत देसाई, विनायक देशमुख आदींसह मोठ्या संख्यने एमआयडीसी मधील कारखानदार व उद्योजक उपस्थित होते. अरविंद पारगावकर म्हणाले, शहराच्या विकासास चालना मिळणे आवश्यक असून शहराबरोबरच एमआयडीसीचे प्रश्न बऱ्याच वर्षांपासूनचे प्रलंबित प्रश्न सोडविणे गरजेचे आहेत.

यावेळी प्रकाश गांधी, प्रमोद मोहळे, हरजितसिंग वधवा, बलभीम पठारे आदींनी विविध सूचना व संकल्पना मांडल्या. शहरातील शिक्षक संस्था व शिक्षकांशी झालेली जन संवाद बैठक श्रीरामकृष्ण एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्रीगोपाल जाखोटिया यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी नानासाहेब देशमुख, ज्ञानसंपदा स्कूलचे प्रवीण बजाज, दामोदर बठेजा, विचर भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी आदींसह मोठ्या संख्यने शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नगर मधील सीए शाखेबरोबर झालेल्या जन संवाद बैठकच्या अध्यक्षपदी शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा होते. यावेळी सर्वश्री सीए प्रसाद पुराणिक, अभय कटारिया, महेश तिवारी, माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, पवन दरक, ज्ञानेश कुलकर्णी, किरण भंडारी आदीसह उपस्थित होते. यावेळी सीए मयूर कासवा यांनी स्मार्ट व ग्रीन नगर सिटीचा तयार केलेला अहवाल यावेळी विचार भारती कडे सुपूर्द केला. नगरच्या विकासाठी लवकरात लवकर आयटी सेंटर सुरु करावे. सरकारी वैद्यकीय महाविद्यालय नगरमध्ये सुरु व्हावे. नगरमध्ये लष्कराच्या अनेक प्रमुख आस्थापने आहेत. त्यामुळे नगरमध्ये एकतरी संरक्षण क्षेत्रातिल उद्योग सुरु होणे गरजेचे आहे. शहरा जवळ विमानतळासाठी जागा उपलब्ध करून विमानतळ सुरु करावे, आदी सूचना यावेळी करण्यात आल्या. यावेळी विचार भारतीच्यावतीने अनिल मोहिते, सुधीर लांडगे, महेंद्र जाखोटे, झंवर उपस्थित होते.

---




# गुरु सुपर मार्केटची तपाकडे वाटचाल!

**समाचार/नगर-दि.१८**

सावेडी येथील माऊली संकुलसमोर असणाऱ्या गुरु सुपर मार्केटमध्ये क्वॉलिटी ड्रायफ्रुट, अस्सल मसाले आणि निवडक दर्जेदार किराणा म्हणजे गुरू सुपर मार्केट हेच समीकरण ठरलेले गेल्या ११ वर्षांपासून. अहमदनगर वासियांच्या अन् खास करून सावेडीकरांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक असलेले गुरू सुपर मार्केट ११ वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेत आहेत. ग्राहक देवो भवः या उक्तीनुसार २०13 साली गुरू सुपर मार्केटची मुहूर्तमेढ रोवली गेली. सर्वोत्कृष्ट दर्जा-सचोटी अन् सेवा या त्रिसूत्रीच्या आधारे दरवर्षी ग्राहकांचा प्रतिसाद वाढत गेला आणि आज गुरू सुपर मार्केटने ग्राहकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले. ९० हून अधिक प्रकारचे ड्रायफ्रुटसची श्रुंखला, बोल्ड प्रकारातील ड्रायफ्रुटची क्वालिटी, तसेच वाढत्या महागाईवर दिलासा देणारी विविध ऑफर्स यामुळे ग्राहकांची इथली खरेदी नेहमीच बचत करून जाते. वर्षभर विविध ऑफर्स, गहू महोत्सव, तांदुळ महोत्सव, खजूर महोत्सव अशा विविध उपक्रमामुळे ग्राहक नेहमीच गुरू सुपर मार्केटला प्रथम पसंती देतात.


**पाहिजेत**

हेल्पर - ४
१० वी पास/नापास
आकर्षक पगार
संपर्क :- 9890027068

**आधार रुग्णसेवा**

आमच्याकडे अपंग, अर्धांगवायू असलेले, अतिवृद्ध अशा आजी, आजोबांसाठी त्यांच्या नर्सिंग केअरसाठी स्टाफ त्वरित उपलब्ध
- संपर्क -
9420205564
9922157008

**परवडणाऱ्या भाड्यात मोक्याची जागा**

होलसेल औषध विक्री, क्लिनिक, पंचकर्म केंद्र, रुग्ण सेवा केंद्र, सी. ए., शेअर गुंतवणूक यांचे व्यावसायिक कार्यालय, स्पर्धा परीक्षा केंद्र, विविध डेपो, गोडावून तसेच राहण्यासाठी चौकात जागा उपलब्ध
पत्ता : शहीद कॅप्टन राजाभाऊ कुलकर्णी मार्ग, जुना मंगळवार बाजार, अहमदनगर
- संपर्क -
7770027505
9561604378

**विकणे आहे**

गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १000 स्क्वे. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.
-: संपर्क :-
9011923939

**विकणे आहे**

नागरदेवळे फाटा, हराळे मळा येथील यलो झोनमधील २० गुंठे जमीन विकणे आहे.
-: संपर्क :-
9226310730

**पाहिजेत**

भूषणनगर, लिंक रोड, केडगाव येथील 'महालक्ष्मी सारीज' या फर्म करिता पुरुष/महिला अनुभवी सेल्समन नेमणे आहेत.
अर्जासह समक्ष भेटा. वेळ : संध्या. ५ ते ७
आकर्षक पगार : पात्रतेनुसार अधिक इसेंटीव्ह
संपर्क :- महालक्ष्मी सारीज
भूषणनगर, लिंक रोड, केडगाव
मोबाईल नंबर :- 9850221514

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी
m डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अ. नगर
७५८८११५१५७/ ९८२२०८१४४०

दैनंदिन व्यवहारांमध्ये स्वतःला इतरांच्या तुलनेत सरस ठेवण्यासाठी व्यक्तिमत्व विकासाची गरज
श्रीं एज्युकेशन ग्रुपमार्फत आयोजित
**व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा**
१६ ते ६० हा वयोगट असून यामध्ये विद्यार्थी युवक व महिला सहभागी होऊ शकतात
आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नामवंत मानसोपचार तज्ज्ञ श्रीकांत कुलांगे
दि. २० ते २३ एप्रिल रोजी (४ दिवसाचा दररोज ८ तास)
श्रीं एज्युकेशन ग्रुप, ४५, ओम बेकर्समागे, किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
शहर व परिसरातील गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा
अधिक माहिती व प्रवेशासाठी पुढील नंबरवर संपर्क साधावा | 9890 420 209

Guru SUPERMARKET SINCE 2013
CHEERS TO SUCCESSFUL 11 YEARS ..
11 ANNIVERSARY
THANKS TO OUR VALUED CUSTOMERS ..
गुरु सुपरमार्केट Since 2013
माऊली संकुलसमोर
झोपडी कॅन्टीन मागे, अहमदनगर
फोन :0२४१-२४१७५७५
सोमवार बंद !


**गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, विश्रामबाग, अहमदनगर**

**निविदा सूचना**

सन २०२४-२०२५ या सालाकरिता खालील तपशिलाप्रमाणे सिलबंद टेंडर्स मागविण्यात येत आहेत.

दि. ३०/०४/२०२४ पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळ सकाळी १0.00 ते ५.३० वाजेपर्यंत टेंडर फॉर्म फी भरून विकत घेता येतील. दर भरून सिलबंद टेंडर दि. ०७/०५/२०२४ रोजी सायंकाळी ५.00 वाजेपर्यंत आमचे कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. अन्य सर्व माहिती/अटी टेंडर फॉर्म सोबत मिळतील. टेंडर उघडण्याचा दि. ०८/०५/२०२४ राहील. कोणतेही कारण न देता टेंडर मंजूर करणे अगर नाकारण्याचे अधिकार संस्थेने राखून ठेवलेले आहेत.

| अ. क्र. | टेंडर प्रकार | फॉर्म फी | बयाणा | डिपॉझिट |
|---|---|---|---|---|
| १ | आयुर्वेद औषधी टेंडर | रु. १५०/- | रु. १५०/- | रु. १५००/- |
| २ | इतर औषधी लॅब केमि. टेंडर | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. १000/- |
| ३ | इतर वस्तू टेंडर | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५००/- |
| ४ | स्टेशनरी साहित्य टेंडर | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५००/- |
| ५ | छपाई टेंडर | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५००/- |
| ६ | धुलाई टेंडर | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५००/- |

मानद कार्यवाह
आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, अहमदनगर

प्राचार्य/अधीक्षक
गं. शा. गुणे आयुर्वेद महाविद्यालय/ रुग्णालय अहमदनगर

सदर जाहिरात गं. शा. गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे www.guneayurvedahmednagar.org या संकेतस्थळावर पाहता येईल.


टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक - १९ एप्रिल ते २५ एप्रिल २०२४




| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 8.00 AM, 11.10 AM, 02.15 PM, 07.00 PM, 11.00 PM |
| मैदान | 8.30 AM,12.00 PM, 6.45 PM,10.15 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 03.25 PM |
| GODZILLA X KONG | 5.30 PM |
| CREW | 01.25 PM, 10.30 PM |
| राजकारण गेलं मिशीत | 04.00 PM |
| द लिगसी ऑफ जिनेश्वर | 10.00 AM, 07.40 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show
CONNPLEX
AVAILABLE ON book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002


UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
UNITED PHARMA
9049934444
7972378081
9822020649



अखंडित गरम पाण्यासाठीचा सोपा मार्ग
१७ वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेत
आदित्य एंटरप्राईजेस
गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
मोबाईल नं. : ९३२५१०३७८१